**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५८७/०२**

**श्री. सदानंद शि.कदम**
**चनाचाळ, ११/२/३, नागरिक सेवा मंडळ,**
**जी.डी.आंबेडकर मार्ग,**
**काळा चौकी, मुंबई ४०० ०३३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त**
**(परिमंडळ ३).**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावळा कंम्पाउंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सदानंद शि.कदम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून, दि.१६.०६.२००९ रोजी आयोजित लग्नसोहळा मोडण्यासंबंधी Control रुमला दूरध्वनी करुन केलेल्या तक्रारी इसमाचे नाव व त्याने ज्या दूरध्वनीवरुन फोन केला तो दूरध्वनी क्रमांक मिळणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.१७.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.३१.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजि केली. अपीलकाराने मागीतलेली माहिती त्यांना दिल्यास माहिती देणा-याच्या जिवीतास / सुरक्षिततेस धोका निर्माण होईल याबाबत अपीलकारास समजावून सांगीतले. उक्त अधिनियमातील कलम ८(१) (छ) अन्वये माहिती नाकारण्यात आली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लग्न सोहळा मोडण्यासंबंधी Control रुमला दूरध्वनी करणा-या इसमाचे नाव व त्याने ज्या दूरध्वनीवरुन फोन केला तो दूरध्वनी क्रमांक मिळण्याबाबत मागणी केली होती. Control रुमला दूरध्वरी करणा-या व्यक्तीचे नाव मिळाल्याने कोणतेही सार्वजनिक हीत साद्य होणार नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी दि.३१.०८.२००९ रोजी पारित केलेले आदेश बरोबर आहेत. त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सदर प्रकरणी नियमानुसार कारवाई पूर्ण झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६०८/०२**

**श्री. ईश्वरभाई दत्तात्रय हंकारे**
**६, राजगृह सह.गृह.संस्था,**
**शिवाजी नगर, वालधुनी, कल्याण ०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**(रोख शाखा), महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
**(रोख शाखा), महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. ईश्वरभाई हंकारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, दि.१७.०१.२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर झालेल्या दैनंदीन तपासाबाबतच्या कारवाईचा तपशीलवार लेखी अहवाल मिळण्याबाबत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने योग्य पूर्ण माहिती दिली नसल्याच्या कारणामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२१.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईबाबत ४ मुद्यावर माहिती मागीतली होती. त्यामध्ये महसूल व वन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती निला सत्यनारायण यांचे कर्तव्य आणि त्यांनी शासनाकडून सन २००८ मध्ये घेतलेल्या वेतनाची तपशिलवार माहिती, त्यांनी आयकर विभागास दिलेले विवरणपत्र, त्यांचे स्थावर मिळकतीची तपशिलवार माहिती. शासनाकडून घेतलेला प्रवास भत्ता (T.A.) इतर सवलती इत्यादि कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती.

श्रीमती.निला सत्यनारायण यांच्या वेतनाबाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. श्रीमती. सत्यनारायण यांना जानेवारी, २००८ ते ऑक्टोंबर, २००८ पर्यंत रु.६, १६, ९५०/- इतके वेतन आदा केले आहे. शासकीय कामकाजासाठी केलेल्या प्रवास खर्चासाठी रु.१, ६४, १०२/- रक्कम आदा करण्यात आली आहे. श्रीमती. सत्यनारायण यांची इतर वैयक्तिक स्वरुपाची माहिती रोख शाखेकडे उपलब्ध नाही. श्रीमती. सत्यनारायण हया सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारित येतात असे जन माहिती अधिका-यांने अपीलकारास कळविल्याचे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. पूर्णरित्या माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन व्दितीय अपील केल्याचे अपीलकाराने व्दितीय अपीलात नमुद केले आहे. सदर प्रकरणी अपीलातील कागदपत्रातील तपासणी केली असता असे दिसून येते की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७३८/०२**

**श्री. नरेंद्र नगराळे**
**७३, भाग्यलक्ष्मी, भगवती नगर,**
**देवपूर, धुळे ४२४ ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**(क.व.औस)**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**वाहतूक भवन, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी**
**(सेवा मंडळ),**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**वाहतूक भवन, मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. नरेंद्र नगराळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.१२.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकारास सेवानिवृत्तीनंतर उपदानाची रक्कम वेळेवर आदा न केल्यामुळे रू.५०, ०००/- ची नुकसान भरपाई व नियमाप्रमाणे १०% दाराने उपदानाच्या रक्कमेवर व्याज मिळणेबाबत व कार्यवाहीच्या तपशिलाची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२८.०१.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास उत्तर पाठवून उपदानावरील व्याज व दंडाची मागणी अमान्य करण्यात आली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.११.२००९ रोजी औरंगाबाद, जिल्हाधिकारी कार्यालयातील Video Conferencing रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम विलंबाने मिळाल्याच्या कारणावरुन नुकसान भरपाई व व्याजाची रक्कम मिळण्याबाबत विनंती केली होती. अपीलकाराने, नियंत्रण प्राधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे उपदान मिळण्याबाबत दि.०८.०६.२००७ रोजी दावा सादर केला होता. अपीलकाराविरुध्द, सेवेत असतांना केलेल्या गैरकृत्याबध्दल कारवाई सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अर्जदाराची उपदानावरील व्याज व दंडाची मागणी मान्य करण्यांत येउ नये अशी जन माहिती अधिका-यांनी सहाय्यक कामगार आयुक्ताकडे अपीलावरील सुनावणीचेवेळी युक्तीवाद केला. सहाय्यक कामगार आयुक्त यांनी अपीलकाराची उपदानावरील व्याज व दंडाची मागणी अमान्य केली. याकरिता अपीलकाराने संबंधीत सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे आवश्यक आहे. सदरबाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७३९/०२**

**श्री. शशिकांत प्रेमराज चेगडे**
**३४६३, ख्रिस्त गल्ली, अहमदनगर ४१४ ००१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (का.६)**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शशिकांत चेंगडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०७.२००८ रोजी अर्ज करुन, मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संबंधी ५ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.०६.१३.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपील निकाली काढले. यामुळे समाधान झाले नाही. म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सेवा विषयक बाबी संबंधी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली. प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकार अनुपस्थित होते. व्दितीय अपीलावरील सुनावणी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुममध्ये आयोजित केली. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. अर्जातील कोणत्या मुद्याबाबत महिती मिळाली नाही. अपूर्ण माहितीबाबत अपीलकाराने व्दितीय अपीलात काहीही तपशिल दिला नाही. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली आहे. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २५.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४०/०२**

**श्री.रविंद्र बाबुराव खरे**
**मु.पो.ता.पाचोरा, जि.जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**(क.व.औ.सं.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मधवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी अधिकारी**
**(कर्मचारी वर्ग खाते), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मधवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रविंद्र बाबुराव खरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०९.२००८ व दि.२५.०९.२००८ रोजी अर्ज करुन, प्रकल्पग्रस्त उमेदवार यांच्या जाती जमाती निवडीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१९.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सहाय्यक वाहतुक अधिक्षक (कनिष्ठ) व वाहतुक निरीक्षक (कनिष्ठ) या पदांच्या भरतीसाठी प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्तासाठी जातीनिहाय आरक्षणानुसार येणा-या पदाची संख्या व मुलाखतीत निवड केलेल्या उमेदवारांची संख्या याची माहिती दि.१०.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आली असल्याचे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.११.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जातीच्या वर्गवारीनुसार अनुसूचित जातीच्या १२ जागामध्ये प्रकल्पग्रस्त उमेदवार कोणता घेतला याबाबत माहिती मागीतली होती. सहाय्यक वाहतुक अधिक्षक व वाहतुक निरीक्षक या पदाच्या भरतीसाठी प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तासाठी असलेल्या ५% आरक्षणानुसार एकूण ११ जागा आरक्षीत होत्या. त्याकरिता उपलब्ध असलेल्या ३० उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात आलेले होते. मुलाखतीत निवड झालेल्या उमेदवारांची जातीनिहाय माहिती खालीलप्रमाणे अपीलकारास दि.१०.१०.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविली आहे.

| अजा | अज | वि.जा.भ.ज | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | | | | |
| १ | १ | - | - | १ | २ | - | ६ | १ | १२ |

यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. यामुळे सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.११.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४७/०२**

**श्री.हस्नुद्दीन बद्रुदिदन काझी**
**२४ बी, भक्तीनगर, को.ऑ.हौ.सोसायटी,**
**साहिल लॉन्सच्या पाठीमागे, वडाळा रोड,**
**नाशिक ४२२ ०११.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जल संपदा विभाग,**
**(आस्थापना संनियंत्रण),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**जल संपदा विभाग,**
**(आस्थापना संनियंत्रण),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हस्नुद्दीन काझी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.११.२००७ रोजी अर्ज करुन, अन्यायग्रस्त प्रमुख आरेखकांची शासनास प्राप्त झालेली एकूण निवेदनांची यांदी पैकी शासनाने निपटारा केलेली निवेदनाची व निर्णयाची यादी शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाची कालावधीनुसार यादी इत्यादी अनुषंगीक माहिती अपीलकाराने मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०५.०५.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.०६.२००८ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रमुख आरेखक या पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या मुख्य मागणीनुसार इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास एकूण ९ मुद्यावर माहिती पुरविली. सदर प्रकरणी बरेच निवेदने संबंधीतांनी सादर केली आहेत. उर्वरित माहिती जलसंपदा विभागातील सनियंत्रण कार्यासनाकडून पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अन्वये कोणत्याही परिस्थितीत ५ दिवसात त्या संबंधीत प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावा व अर्जदारास तत्संबंधी सूचना द्यावी. कलम ६(३) मध्ये **<u>अन्य प्राधिकरण (Another Public Authority)</u>** याबाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. अशा प्रकरणी ज्या जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झालेला आहे, त्यांनी स्वत:च्या प्राधिकरणाशी संबंधीत माहिती पुरवून अर्जदारास इतर मुद्याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे वेगळे अर्ज करण्याचे सुचवावे, अशा आशयाचे मार्गदर्शन केंद्र शासनाच्या मिनीस्ट्री ऑफ पर्सीनेल पब्लिक ग्रिव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स डिपार्टमेंट ऑफ पर्सिनेल ॲन्ड ट्रेनिंग यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्र.१०/०२/०८ आर आर, दि.१२.०६.२००८ अन्वये प्रस्तूत करण्यात आले आहे. सदर बाब लक्षात घेता सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी त्यांचेशी संबंधीत माहिती दिली आहे. उर्वरित माहितीकरिता अपीलकाराने इतर

अन्य जन माहिती अधिका-यांशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७१७/०२**

**श्री. काळे हेमचंद्र जगन्नाथ**
**३१ समर्थ कॉलनी, एम.जे कॉलेज रोड,**
**जळगांव, ता.जि.जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विधान मंडळ सचिवालय,**
**विधान भवन, बॅकबे रेक्लेमेशन,**
**विधान भवन मार्ग, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**विधान मंडळ सचिवालय,**
**विधान भवन, बॅकबे रेक्लेमेशन,**
**विधान भवन मार्ग, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमचंद्र काळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०२.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१) महाराष्ट्र राज्य निर्मिती झाल्यापासुन झालेल्या पहिल्या अधिवेशनापासून आज पावेता मुख्यमंत्री, वन मंत्री, वन राज्यमंत्री यांनी वनविभागाचे वतीने विधानसभेत प्रश्ननिहाय दिलेल्या आश्वासनाच्या प्रति मला पुरवाव्यात. सदर आश्वासने पुर्ततेसाठी जो कालावधी संबंधित मंत्री महोदयांनी दिला त्या कालावधीत आश्वासन पुर्तता झालेली व पुर्तता प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संपुर्ण माहिती व त्यासंबंधित संपुर्ण नस्ती / उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच आपल्या कार्यालयाने आश्वासनांच्या पुर्ततेकरीता केलेल्या पाठपुराव्याबाबतीच संपूर्ण माहिती मला तात्काळ पुरविणेत यावी. आपल्या

आदेशाची अवहेलाना संबंधितांनी आश्वासन पुर्ततेकामी केलेली असल्यास आपण त्यांचेविरुध्द केलेल्या कारवाई बाबतची समग्र माहिती मला तात्काळ पुरवावी.

२) आमदार एकनाथ गणपत खडसे, कोथळी ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव यांनी आपले कार्यालयात व कार्यालयाबाबत केलेल्या तक्रारी, आदेश त्यासहची संपुर्ण कागदपत्रांचया नकला मला तात्काळ पुरवाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीकरिता अपीलकारास बोलावले. महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन असल्यामुळे अपीलकारास विधानभवनाच्या इमारतीत प्रवेश मिळाला नाही. इमारतीत प्रवेश मिळण्यासाठी प्रवेशपत्र उपलब्ध करून देणेबाबत दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता अपीलकारास प्रवेश पत्र दिले नाही. त्यामुळे अपीलकार, प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता उपस्थित राहू शकले नाहीत. माहिती मिळाली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, मा.मुख्यमंत्री, वन मंत्री, वन राज्यमंत्री यांनी वन विभागाच्यावतीने विधानसभेत प्रश्ननिहाय दिलेल्या आश्वासनाच्या प्रती पुरविण्याबाबत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. श्री.काळे यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करुन त्यासाठी रु.१२३०/- इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिनांक १९ मार्च, २००८ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकाराने शुल्क भरले नाही. त्यामुळे अपीलकारास माहिती पुरविता आली नसल्याचा जन माहिती अधिकारी श्री.एल.एन.जाधव यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उत्तरवादीने माहिती

पोटी विहित कालावधीत शुल्क भरण्याबाबत कळविले होते. शुल्क भरल्यानंतर अपीलकारास माहिती प्राप्त करुन घेता येईल. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५५/०२**

**श्री. काळे हेमचंद्र जगन्नाथ**
**३१ समर्थ कॉलनी, एम.जे कॉलेज रोड,**
**जळगांव, ता.जि.जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कृषी विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कृषी विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हेमचंद्र काळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१) मार्च २००५ पासून एप्रिल २००८ पर्यंतच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेले बाबनिहाय, प्रकल्पनिहाय, गाव, तालुकानिहाय, अनुदानाची खर्चाची समग्र माहिती मला उपलब्ध करुन द्यावी.

२) जिल्हयातुन निधी परत गेल्याची माहिती प्रकल्प, गांव, तालुका, रक्कमदिनांक कारणे इत्यादिंची समग्र माहिती मला उपलब्ध करुन द्यावी.

३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जळगांव जिल्हा आणि सर्व तालुके कार्यालयात आलेल्या, माहिती दिलेल्या, अपील झालेल्या मा.आयोगाकडे दुसरे अपील दाखल झाल्याची समग्र माहिती मला उपलब्ध करुन द्यावी.

४) जळगांव जिल्हयात भ्रष्टाचारांची चौकशी टोकन/सिध्द झालेल्या अधिकारी यांचा तपशिल, विभागीय चौकशीत आरोप सिध्द अहवाल, कारवाई इत्यादिबाबतची समग्र व बाबनिहाय माहिती मला उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०५.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जळगाव जिहयाकरिता बाबनिहाय, प्रकल्पनिहाय, गाव तालुक निहाय अनुदान, खर्च इत्यादी अनुषंगीक ४ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती क्षेत्रीय स्तरावरील असल्याने सदर प्रकरणी माहिती, जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हापरिषद जळगाव यांनी अपीलकारास उपलब्ध करुन द्यावयाची आहे. या परिसिथतीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. आयोगाच्या आदेशानुसार अपीलकारास माहिती देणेबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.जी.के.राउत यांनी जिल्हा कृषी अधिकारी, जि.प.जळगांव यांना शासन स्तरावरुन लेखी सूचना द्याव्यात. याबाबत अपीलकारास अवगत करावे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३०७/०२**

**श्री. मुदखेडकर महमंद इकबाल महमंद युसुफ**
**मुख्य संपादक सा.सत्यवत्त, मिलकॉर्नर,**
**बस स्टॅन्ड रोड, नांदेड.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,**
**मॅजेस्टीक आमदार निवास,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,**
**मॅजेस्टीक आमदार निवास,**
**मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मुदखेडकर महमंद इकबाल महमद युसूफ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.२००६ रोजी अर्ज करुन, कायदा १९९५ अंतर्गत जमीन आदलाबदल केल्याच्या नोंदणी करारनामा अंतर्गत नांदेड येथील सर्व्हे क्र.५७ मौजे असरजन ता.जि.नांदेड येथील एकूण २४ एकर जमिनीचा कायदा १९९५ अंतर्गत जमीन अदलाबदल केलेल्या करारनाम्याची सत्यप्रत मिळण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपील दाखल करुन घेतले नाही. ते परत पाठविण्यात आले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित वेळेत दिली नाही. वक्फ मंडळात प्रथम अपिलीय प्राधिकारी नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपील दाखल करुन घेतले नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती उक्त अधिनिमातील कलम ७ चा भंग करणारी आहे. वक्फ मंडळात, प्रथम अपिलीय प्राधिकारी नसल्याच्या कारणावरुन, प्रथम अपील, अपीलकाराकडे परत का? पाठविण्यात आले. याबाबत वक्फ मंडळातील जन माहिती अधिका-यांनी खुलासा सादर करावा. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नसल्याने त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती लादण्याची कारवाई का? करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. सदर प्रकरणी अपीलकारास १५ दिवसात विनाशुल्क माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५१/०२**

**श्री.हेमंत माणिकलाल छाजेड**
**६, महावीर सोसा, मोहाडी रोड,**
**जळगांव ४२५ ००१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**मा.मुख्य न्यायाधिश,**
**उच्च न्यायालय मुंबई यांचे कार्यालय,**
**मुंबई खंडपीठ, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.मुख्य न्यायाधिश,**
**उच्च न्यायालय मुंबई यांचे कार्यालय,**
**मुंबई खंडपीठ, फोर्ट, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हेमंत छाजेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०३.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्रातील अखील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर स्वामीशुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी वसूल केलेले नाहीत ते वसूल होणेबाबत एकूण ३ अनुषंगीक मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२ मे, २००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.०१.०१.२००८ चा संघटनेचा अर्ज / निवेदन पत्र प्राप्त झाल्यावर त्यावर लिहिलेले कार्यालयीन टिप्पणी / शेरे इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती वन विभाग महाराष्ट्र राज्य, मंत्रायल, मुंबई यांचेशी संबंधीत आहे. तरी सदर प्रकरणी ग्रा-हाणे दूर करण्याकरिता वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सक्षम प्राधिका-याकडे संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१३.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २६.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७६३/०२**

**श्री.भा.भा.पाटील**
**शासकीय दूध योजना, धुळे,**
**ता.जि.धुळे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व**
**मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व**
**मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. भा.भा.पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००७ रोजी ब्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०५.२००७ रोजी अर्ज करुन, मा.विधानपरिषद सदस्य / अध्यक्ष, मा.राज्यमंत्री व मा.उच्च न्यायालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचा करण्यात आलेला अवमान दि.२८.०९.२००० च्या निवेदनावर दररोज काय कारवाई झाली, त्याचा अहवाल, अर्जावर कार्यवाही करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिका-याचे नाव, त्यांनी कोणता निर्णय घेतला इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली. नसल्याने अपीलकाराने दि.२२.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे ब्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, एकूण ९ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकाराविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित होती. विभागीय चौकशी विहित कालमर्यादेत का पूर्ण करण्यात आली नाही म्हणून अपीलकाराने एकूण ९ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास दि.२१.११.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/२५०५/०२

श्री. मनवर मधुकर भिमराव
बी.एम.काळबांडे, महसूल नगर,
चैत्यन्य नगर रोड, नांदेड. .... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी

विवेचन

अपीलकार श्री. मनवर मधुकर भिमराव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०६.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००५ रोजी अर्ज करुन, विद्यार्थ्यांचे प्रश्न व महाविद्यालयामधील आर्थिक गैरव्यवहारासंदर्भात डॉ.सरोदे, सह संचालक, तंत्रशिक्षण विभाग, औरंगाबाद यांचकडे २५.०८.२००३ रोजी केलेल्या तक्रारीवरुन डॉ.खोडके, प्राचार्य, शासकीय अभियांत्रीकी महाविद्यायल, अमरावती यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२९.०५.२००६ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी तंत्रशास्त्र महाविद्यालय या संस्थेविरुध्द विविध स्तरावरुन प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने डॉ.खोडके, प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती यांनी केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली होती. चौकशी अहवालावर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या माहितीची प्रत अपिलीय प्राधिकारी (तंत्र शिक्षण) यांनी दि.२९.०५.२००६ च्या पत्राव्दारे अपीलकारास उपलब्ध करुन दिली. सदर बाब प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २६.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६३८/०२**

**श्री. पंढरीनाथ बाबुराव बोडके**
**मु.मोह, पो.चिंचोली,**
**ता.सिन्नर, जि.नाशिक. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**नविन प्रशासन भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**नविन प्रशासन भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. पंढरीनाथ बोडके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०३.२००९ रोजी अर्ज करुन, राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद खंडपीठ यांनी अपीलकाराच्या तक्रार अर्जावर कार्यवाही केली नाही. म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांच्या विरुध्द दि.२४.११.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर माहिती आयुक्ताविरुध्द प्राप्त तक्रार अर्जाच्या संकलनात ठेवली असून त्यावर आवश्यकती कार्यवाही सुरु आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपीलकारास उत्तर दिलेले आहे. त्यावेळी नस्ती क्र.रामाआ २००९/प्र.क्र.१५६/०९/६ वरील निर्णयाबाबत विशेष प्रगती

झालेली नाही. सदर गोपनीय कार्यवाही पूर्ण झालेली नाही. यामुळे जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याचे नमूद करुन दि.२२.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद खंडपीठ यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत उत्तर दिले आहे. राज्य माहिती आयुक्ताविरुध्द अपीलकाराची तक्रार आहे. सदर तक्रारीची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविली आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६७७/०२**

**श्री.नगराज जनार्दन पाटील**
**१८२, भिकमचंद जैननगर, जळगांव**
**ता.जि.जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त,**
**आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,**
**वरळी, सी फेस, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,**
**वरळी, सी फेस, मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. नगराज पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, जळगांव बाबत एकूण १५ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलीय प्राधिका-यांनी दि.०८.०१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सह निबंधक, सहकारी संस्था (दूध) यांनी दि.१५ मार्च, २००८ पर्यंत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे दि.१०.०१.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपीलकारास दि.१५ मार्च, २००८ पर्यंत माहिती प्राप्त करुन द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.१० जानेवारी, २००८ रोजी आदेश दिले होते. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाचे पालन केले नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या दि.१०.०१.२००८ च्या आदेशाचे का? पालन केले नाही. याबाबत जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येउ नये याबाबत आयोगाकडे खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६४०/०२**

**श्री. एल.एस.कोल्हे**
**मु.पो.तालुका-कोपरगांव,**
**इंदिरा पथ, कोपरगांव,**
**जि.अहमदनगर ४२३ ६०१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रायल, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रायल, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. एल.एस.कोल्हे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०२.२००९ रोजी अर्ज करुन, श्री देवाडकर, अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक व कार्यकारी अभियंता श्री.पाटील हे अपीलकाराच्या सेवानिवृत्ती वेतनात वाढ करत नाहीत. याबाबत दिलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०३.२००९ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने व्यथीत होउन राज्यह माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित

होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, अपीलकाराचया सेवानिवृत्ती वेतनवाढी संबंधीच्या मागणीबाबतचा मुध्दा Settled झाला आहे.  सेवानिवृत्ती लाभ देण्यात आले आहेत.  सदर प्रकरणी विलंब झाला असल्याबाबत अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्या विरुध्द अपीलकाराची तक्रार आहे.  यासंबंधी अपीलकारास अंतरिम उत्तर जन माहिती अधिका-यांनी दिले असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या मागणी संबंधीची अंतीम माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २६.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६३९/०२**

**श्री. एल.एस.कोल्हे**
**मु.पो.तालुका-कोपरगांव,**
**इंदिरा पथ, कोपरगांव,**
**जि.अहमदनगर ४२३ ६०१. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**निबंधक जनरल,**
**मा. उच्च न्यायालय, मुंबई**
**फोर्ट, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा. उच्च न्यायालय, मुंबई**
**फोर्ट, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. एल.एस.कोल्हे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०१.२००९ रोजी अर्ज करून, सोलापूर महानगरपालिकेतील निवृत कर्मचा-यांना वेतन वेळीच द्यावे असे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्णय दिला आहे त्याची छायाप्रतीची मागणी केली होती. मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार नियम, २००६ मधील नियम ३ अनुसार माहितीच्या अर्जावर रु.१२/- इतक्या रक्कमेचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. तसेच अर्ज फॉर्म अे च्या नमुन्यात करणे आवश्यक आहे. अर्जासोबत पोस्टाचे टीकीट लावलेला पोच पावतीचा लिफापा जोडणे आवश्यक आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे माहितीचा अधिकार नियम, २००६ हे http:\hebom.men.nic.in या सकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. न्यायालयीन कामकाजाची किंवा कागदपत्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत पुरविण्यात येत नाहीत. याकरिता मुंबई उच्च न्यायालयाच्या नियम आदेशानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब

करुन माहिती प्राप्त करता येते. असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर, मुंबई उच्च न्यायालयाच्या माहितीचा अधिकार नियम, २००६ अनुसार रु.४०/- रक्कमेचे कोर्ट फी स्टॅंम्प लावणे आवश्यक आहे. अपीलकाराने फक्त रु.२०/- एवढया रक्कमेचे स्टॅंम्प लावले आहेत. तरी आणखी रु.२०/- इतक्या रक्कमेचे स्टॅंम्प लावणे आवश्यक आहे. सदर त्रुटीची पुर्तता १५ दिवसाचे आत करावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. मुंबई उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार नियम, २००६ त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार माहितीच्या अधिकारातील अर्जावर रु.१२/- व प्रथम अपीलावर रु.४०/- इतक्या रक्कमेचे कोर्ट फी स्टॅंम्प लावणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी नियमानुसार अपीलकारास उत्तर देण्यात आले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७६७/०२**

**श्री. अब्दुल मजीद मुसा शहा**
**किल्ला झोपडपट्टी,**
**रविवार वॉर्ड, घर नं.१२२,**
**गल्ली नं.४, मालेगाव,**
**जि.नाशिक ४२३ २०३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाव्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या,**
**प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या,**
**प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अब्दुल मजीद मुसा शहा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०३.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०१.२००७ रोजी अर्ज करुन, उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या शहर उप विभाग क्र.३ जुना आग्रा रोड, मालेगाव, जि.नाशिक या विभागात किल्ला रविवाद वार्ड चे सुपरवायझर श्री यादव साहेब यांनी त्यांच्या कारकीर्दीत मनमानी कारभार करुन विद्युतमंडळाचे आर्थिक नुकसान केल्याबाबत ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२८.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगात व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीबाबत, घरगुती नवीन विद्युत जोडणीमध्ये कंपनीचे आर्थिक नुकासान करण्यात येत असल्याने त्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. व्दितीय अपीलावरील Video Conferncing वरील सुनावणीचेवेळी अपीलकाराच्या प्रतिनिधीने सांगीतले की, अपीलकार सदर प्रकरणी माहितीसाठी अग्रह धरत नाही असे लेखी निवेदन दिले आहे. सदर प्रकरणी माहिती प्राप्त करण्याकरिता अपीलकार अग्रह करत नाहीत. यावरुन अपीलकाराने अपील मागे घेतले असे होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६४१/०२**

**श्री. एल.एस.कोल्हे**
**मु.पो.ता.कोपरगांव,**
**इंदिरापथ, कोपरगांव,**
**जि.अहमदनगर ४२३ ६०१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य मानव हक्क आयोग,**
**९, हजारिमल सोमानी मार्ग,**
**सी.एस.टी. स्टेशन समोर, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य मानव हक्क आयोग,**
**९, हजारिमल सोमानी मार्ग,**
**सी.एस.टी. स्टेशन समोर, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एल.एस.कोल्हे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०४.२००९ रोजी अर्ज करुन, राज्य मानवी हक्क आयोग यांची कार्यपध्दती, कोणती प्रकरणे मानव अधिकाराकडे पाठविता येतात, त्यासंबंधीची मराठीमधील नियमावली पुस्तीका, असल्यास त्याची किंमत व टपाल खर्च कळवावा अशी मागणी केली होती. माहिती योग्यरित्या दिली नाही. म्हणून दि.०७.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. अपीलकाराने माहितीपोटी रु.४०/- इतके शुल्क भरले होते. त्यांना रु.३५/- इतक्या रक्कमेची पावती मिळाली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास रु.५/- परत करावेत. अर्जदाराशी जन माहिती अधिका-यांनी सौजन्याने वागावे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

पारित केलेल्या आदेशाचे पालन केले नाही. म्हणून जन माहिती अधिका-यांना दंडीत करावे म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मानवी हक्क आयोगाच्या कार्यपध्दतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने माहितीपोटी एकूण रू.४०/- इतके शुल्क भरले होते. अपीलकारास रू.३५/- एवढया रक्कमेचीच पावती मिळाली. उर्वरित रू.५/- अपीलकारास Money Order ने परत करण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. जन माहिती अधिका-यांना रू.५/- परत केलेले नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मानवी हक्क आयोगाने अपीलकाराचे रू.५/- मानवी हक्क आयोगाच्या खर्चाने, Money Order ने अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत परत करावेत.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४५५/०२**

**श्री. प्रशांत जयमल्हार बिडवई**
**शनिनगर, श्री रामदर्शन अपार्टमेंट,**
**२ रा माळा, बदलापूर (प),**
**ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ १२, दहिसर (पू), मुंबई ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, मुंबई ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पू),**
**मुंबई ४०० १०१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रशांत बिडवई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०३.२००९ रोजी अर्ज करुन, मोटर अपघात FIR No.२३/०८ दि.२५.०१.२००८ एम.एच.बी. कांदविली पो.स्टे.गाडी नं.MH.०२.XA.०८३३ दि.३०.०३.२००९ MH.०२.६५५५ अपघातातील दोन्ही गाडयांचे पेपर द्यावे. सदर अपघातात ड्रायव्हरचे नाव, पत्ता, कोर्ट केस नं. पुढील तारीख तसेच कुठले कलम लावले त लेखी द्यावे. तसेच ड्रायव्हिंग लायसन्स कॉपी, दोषारोपत्र FIR, Accident Report Form Copy, गुन्हयातील टिपण सत्य प्रत करून देणे. तसेच हया सर्व गोष्टीची पूर्तता करुन द्यावी.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ११ अनुसार पुरविता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०४.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

दि.२९.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मोटार अपघाताबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकार हे ईश्युरंस कंपनीत नोकरी करतात. कंपनीतर्फे त्यांनी संबंधीत पोलीस ठाणे अथवा कोर्ट येथे जावून ईश्युरंस कंपनीला लागणारी कागदपत्रे जमा करुन देण्याचे काम करतात व त्याचा त्यांना मोबदला मिळतो. अपीलकाराने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याच्या कारणावरुन ती नाकारली आहे. अपीलकाराने कोणत्या कारणाकरिता माहिती मागीतली आहे याबाबत जन माहिती अधिका-यांना परिनिरीक्षण करता येणार नाहीत. अपीलकार कोणत्या कारणाकरिता माहिती मागत आहे त्याची कारणे अपीलकारास विचारता येणार नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६४७/०२**

**श्री. प्रमोद म.शिदसाठ**
**श्री श्रीधर कचरू दाणी,**
**रूम नं.५, ब्लॉक-२३,**
**नवीन भाजी मार्केट जवळ,**
**ता.जिल्हा-नाशिक. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.आबंडेकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका शालेय इमारत,**
**१ ला मजला, हिंदू कॉलनी, दादर (पू), मुंबई ४०० ०१४. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रमोद शिरसाठ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.१२.२००८ रोजी अर्ज करुन, शिक्षण विभाग (प्राथमिक) निरीक्षक (शाळा) पदाकरिता जाहिरात क्र.ईओई/५३१७ दि.०७.१०.२००८ नुसार अंतिम निवड झालेल्या खुल्या गटातील उमेदवारांबाबत खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

१. अंतिम खुल्या गटातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या अंतिम निवड यादीची Certified True copy मला मिळावी.
२. अंतिम निवड यादीतील प्रत्येक उमेदवारांच्या, पदवी परिक्षेची गुणपत्रिका, बी.एड.गुणपत्रिका आणि अध्यापन अनुभव प्रमाणपत्र यांच्या Certified True Copies कृपया मला मिळाव्यात.

३. अंतिम निवड यादीतील प्रत्येक उमेदवारांचे काढलेल्या सरासरी गुणांचे (पदवीचे, बी.एड.गुण) calculation (सविस्तर) कृपया मला कळवावे.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.२४.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित करुन अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शिक्षण विभागातील शाळा निरीक्षक (प्राथमिक) पदाकरिता खुल्या गटातून निवड झालेल्या उमेदवाराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकारास दि.१८.०५.२००९ व दि.२९.०९.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली. सदरपत्राच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर केल्या. यावरुन जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६५०/०२**
**अपील क्र.२००९/३६४९/०२**

**श्री.रविंद्र निळकंठ बोरसे**
**मु.पो.नरडाणा, ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे ४२५ ४०४. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक (प्रशासन)**
**संचालनालय, लेखा व कोषागारे मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक**
**लेखा व कोषागारे, शासकीय कुटीर १७६, फोर्ट, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रविंद्र बोरसे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०१.२००९ रोजी अर्ज करुन,

सन २००८ मधील शासनास सादर केलेली सहा.लेखा अधिकारी विनंती बदली फाईल टिपणीसह मंजूरी दिलेल्या बदली आदेशासह (सुरुवात ते संपेपर्यंत) संदर्भात सादर केलेले सर्व कागदपत्रांच्या पत्री तसेच मा.वित्तमंत्र्यांसह सर्व शासकीय/अशासकीय/राजकीय/शिफारस पत्र यांच्या छायांकित प्रती.

जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२४.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या नियुक्तीसंदर्भात अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपीलकाराने एकुण १० मुद्यावर माहिती मागीतली होती. माहितीची व्याप्ती पहाता प्रत्यक्ष दस्तऐवज कार्यालयात पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिला जाईल असा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०८.२००९ च्या प्रथम अपिलावर निर्णय कळविला होता. अपीलकार संबंधीत कागदपत्राच्या पहाणीकरिता कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. अपीलकाराचा दि.०९.०१.२००९ चा अर्ज व दि.२४.०३.२००९ च्या प्रथम अपीलानुसार श्री.बोरसे यांना जी माहिती पुरविण्यात आली त्याबाबतचा लेखी अहवाल प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास सादर केला. सदर अहवालाचे निरीक्षण केले असता अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/३६५९/०२

**श्री.राजेंद्र दत्तात्रय पाडळकर**
**प्राचार्य,**
**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहा,**
**जि.नांदेड.** .... अपीलकार

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्र.१००३६,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्र.१००३६,**
**मुंबई ४०० ००१.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अपीलकार श्री.राजेंद्र पाडळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०२.२००९ रोजी अर्ज करुन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्याअंतर्गत पूर्वी पदिविका पास श्रेणी अधिका-यांना वर्ग १ (अ) (क) संवर्गात पदोन्नती देण्यात आली होती का? असल्यास त्या पदोन्नती आदेशाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२०.०२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती द्यावी असे दि.०६.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. मागणी केल्याप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, खात्यांतर्गत यापूर्वी पदविका पासश्रेणी अधिका-यांना वर्ग-१ अ (क) संवर्गात पदोन्नती देण्यात आली होती का? असल्यास पदोन्नती आदेशाची प्रत देण्याची अपीलकाराने मागणी केली होती. खात्यांतर्गत यापूर्वी पदविका पासश्रेणी अधिका-यांना वर्ग-१ अ (क) संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यामुळे पदोन्नती आदेशाची प्रत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६७८/०२**

**श्री.शिवानंद म.खद्ये**
**मु.पो.मळदुर्ग, ता.तुळजापुर,**
**जि.उस्मानाबाद.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद**
**जि.उस्मानाबाद.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शिवानंद खद्ये यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०३.२००७ रोजी अर्ज करुन, मु.पो.नळदुर्ग ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र.२१६ मध्ये शासनाने वाटप केलेल्या कबाला धारकाची नावे, कबाल्याने दिलेल्या जागांची लांबी रुंदी, सदर जगांच्या चतु:सीमा, कबाल्याच्या नियम व अटी, सदरील सर्व्हे ३ मध्ये असलेल्या शासकीय जागा, रस्ते याच्या चतु:सिमा इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१५.०५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शासनाने वाटप केलेल्या कबाल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे उपस्थित होते. अपीलकारास कार्यालयातील कबाला वाटपाची संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन दिली होती असे जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. सदर प्रकरणी आवश्यकती कार्यवाही एक महिन्याचे आत पूर्ण करुन अपीलकारास माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत आवश्यकती कारवाई पूर्ण करुन अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६४३/०२**

**श्री.दिपक रा.शेळके**
**प्लॅट नं.७, श्रध्दा संकुल-१,**
**जुना गंगापुर नाका, गंगापुर रोड,**
**नाशिक ४२२ ०१३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दिपक शेळके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०४.२००९ रोजी अर्ज करुन, नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचा-यांना वैद्यकीय परिपूर्ती योजना लागू करण्याबाबत एकूण ५ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संबंधीत असल्याने, अपीलकाराचा अर्ज संबंधीताकडे हस्तांतरित करून तसे जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास दि.२२.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे असे नमुद करून दि.१६ मे, २००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, एक कर्मचारी मृत्यूमुखी पडल्यानंतर त्याला कोणतेही वित्तीय लाभ न देणे. दुसरा कर्मचारी क्षयरोगाने पिडीत असतांनासुध्दा वित्तीय सहाय्याची तरतुद असतांना देखील ती न देणे व कर्मचा-यांने पैशाच्या अभावी इलाज बंद केले व त्यातच त्याचा दुर्देवी अंत झाला. सदर गोष्टीचा पाठपुरावा अनेक वर्षापासून करुन सुध्दा कर्मचा-यांना मुलभूत योजना, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन, गट विमा येजना, अंशदान, वैद्यकीय प्रतीपुर्ती, रजा काळातील प्रवास भत्ता इत्यादी लागू न करणे इत्यादी मागण्या अपीलकाराने केल्या होत्या. याबाबत माहिती मिळाली नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केली असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.

विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवाशर्ती नियम निश्चित करण्याबाबत वेळो-वेळी फूटकळ स्वरुपात कार्यवाही करण्यात आली. परंतु त्यामध्ये एकसुत्रता नव्हती. तसेच कर्मचा-यांना अन्य विद्यापीठातील अथवा शासकीय सेवेतील कर्मचा-याप्रमाणे सेवा-सुविधा मिळत नव्हत्या. म्हणून राज्यातील अन्य विद्यापीठांमधील कर्मचा-यांप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवाशर्तीबाबत प्रमाणसंहिता (Standered Code) तयार करण्यासाठी विद्यापीठाने समिती नेमली. समितीचा अहवाल गतवर्षी शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर तातडीने कार्यवाही करुन त्याबाबतचा प्रस्ताव, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्यावर या विभागांनी वेळोवेळी उपस्थित केलेल्या आक्षेपांबाबतची माहिती त्यांना पुरविण्यात आली. आता सुध्दा वित्त विभागाने उपस्थित केलेल्या आक्षेपांबाबत माहिती देवून / खुलासा करुन संबंधीत नस्ती वित्त विभागाला सादर करण्यात आली असून ती सध्या वित्त विभागात प्रलंबित आहे. सदर प्रमाणसंहितेमध्ये कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची बाब समाविष्ट आहे.

जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी वर नमुद केल्यानुसार आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे.  यावरुन अपीलकाराच्या मागण्याची पूर्तता करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिसून येते. सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६६५/०२**

**श्री. मनिष भ.अग्रवाल**
**ए-५१, नाथनगर,**
**सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता**
**मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**इलाख्रा शहर विभाग,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मनिष अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०१.२००९ रोजी अर्ज करुन,

आपल्या विभागांतर्गत चालु व झालेल्या सर्व प्रकारच्या कामांचे लेख्रा शिर्षक निहाय काम करण्याच्या एंजन्सीची प्रलंबित देयकांची जेष्ठता यादिची छायांकित प्रत द्यावीत.

तसेच जेष्ठता यादितील देण्यात आलेल्या देयकांची एजन्सीचे नाव देण्यात आलेले चेक क्रमांक व देयक रक्कमेची लेख्राशिर्षक निहाय यादीची छायांकित प्रति द्यावीत.

तसेच लेख्राशिर्षक निहाय सर्व प्रकारच्या लेख्राशिर्षकातील प्राप्त निधीची छायांकित प्रत व त्यासाठी आपल्या कार्यालयामार्फत मागणी करण्यात आलेल्या पत्राची छायांकित प्रत द्यावीत.

अपीलकाराने मागीतलेली माहिती ही अतिशय विस्तृ त स्वरुपाची असून कागदपत्र ही प्रतीत संख्येने जास्त आहेत. त्याचप्रमाणे दैनंदिन कामकाज व अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता विस्तृत स्वरुपाची माहिती संकलीत करुन त्याच्या प्रती काढून उपलब्ध करुन देणे अवघड आहे.

अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी.  आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी दि.०२.०२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली.  अपीलकाराने जन माहिती अधिका-यांशी संपर्क साधून पूर्वनियोजित वेळ ठरवून संबंधीत कागदपत्र तपासण्यासाठी कार्यालयात जावे.  संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी.  आवश्यक वाटणारी माहिती जन माहिती अधिका-याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश पारित केले.  माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-याच्या विभागांतर्गत चालू झालेल्या सर्व प्रकारच्या कामाचे लेखाशिर्ष निहाय काम करण्या-या एजन्सीची प्रलंबित देयकाच्या जेष्ठता यादीची छायाप्रती तसेच इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून प्रथम संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी.  त्यानंतर निवडक कागदपत्राची मागणी करावी.  त्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती पुरविण्यात याव्यात असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी योग्य ते आदेश पारित केले आहेत.  तरी अपीलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राची तपासणी करुन आवश्यक कागदपत्राच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६४५/०२**

**श्री.नागसेन रा.सुरळकर**
**मु.पो.नाडगांव (दादानगर),**
**ता.बोदवड, जि.जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी**
**(ग्राम पंचायत), पंचायत समिती कार्यालय,**
**मलकापूर, ता.मलकापूर, जि.बुलढाणा.**

**जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**(ग्राम पंचायत), पंचायत समिती कार्यालय,**
**मलकापूर, ता.मलकापूर, जि.बुलढाणा. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.नागसेन सुरळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१२.२००८ रोजी अर्ज करुन, ग्रामपंचायत कार्यालय झोडगा (अनोराबाद) येथील २००० ते ३०.११.२००८ पर्यंतच्या केलेल्या ग्रामपंचायतीच्या व गावाचा विकास कामाचा आढावा मिळणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दि.२३.०१.२००८ रोजी दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ग्रामपंचायत कार्यालय झोडगा येथील सन २००० ते २००८ या कालावधीत केलेल्या विकास कामाचा आढावा मिळणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास सदर प्रकरणी सन २००८-२००९ या कालावधीची गावाच्या विकास कामाची माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६५१/०२**

**श्री. पंढरीनाथ द. पवार**
**पहाड गल्ली नं.१८२७,**
**रा.येवला, जि.नाशिक. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक विशेष अन्वेषण विभाग**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.पंढरीनाथ पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, येवला, जि.नाशिक येथील सिटी सर्व्हे क्रमांक १८१३ अ मधील सौचालयाचा वापर व मोकळया जागेचा वापराचा हक्क, अपीलकाराचे मालकीचे कब्जेवहीवाटीचे आहे असे ठरवून मिळावे. संडासाचे वापरास कोणत्याही प्रकारे हरकत आडथळे करु नये व नास धुस करु नये अशी प्रतिवादीस निरंतरची ताकीद देण्यात यावी. इतर न्याय व योग्य हुकुम वादीचे लाभात व्हावे इत्यादी अपीलकाराची मागणी होती. जन माहिती अधिका-यांनी समाधानकारक माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मुंबई उच्च न्यायालयातील अधिका-याविरुध्द अपीलकाराने अर्ज / अपीलात तक्रार केली आहे. न्यायालयीन कामकाजाबाबत अधिका-याबाबत संदीग्ध तक्रारी केल्या आहेत. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपीलकाराच्या तक्रारी प्रोसेस करुन दप्तरी दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच अपीलकास कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आवश्यकती कारवाई केली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६६७/०२**

**श्री. गजानन गंगाधर स्वामी**
**नुतन नगर परिषद वसाहत,**
**हाडको, परभणी.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकी परिवहन सेवा इमातर, ३ रा मजला,**
**सर पांचखानवाला रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०३०.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकी परिवहन सेवा इमातर, ३ रा मजला,**
**सर पांचखानवाला रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०३०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गजानन स्वामी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०२.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकारास नियुक्ती मिळाली का? नियुक्ती मिळाली नाही तर का? नाही मिळाली. अनुकंपातत्वावर नियुक्ती मिळणार कधी? देणार कधी? याचिका क्र.२५१/०५ या न्यायालयीन आदेश दि.१५.०४.२००५ वर काय कार्यवाही झाली इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. ०५.०३.२००९ व दि.३०.०३.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराचा अर्ज नगरपरिषद परभणी यांचेकडे हस्तांतरित केला. त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे नमुद करुन दि.१९.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने त्यांच्या अनुकंपा तत्तवरील नियुक्तीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६६०/०२**

**श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे**
**मुख्यसंपादक-प्रवक्ता,**
**पत्र पेटी क्र.५, मुख्य पोस्ट ऑफीस,**
**नांदेड-१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सिध्दार्थ तलवारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.०६.२००९ रोजी अर्ज करुन,

वरिष्ठ अधिण्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (शिक्षण-प्रशिक्षण शाखा) अपंगांकरिता आरक्षित पदे या पदांवर शिफारस पात्र उमेदवार १) हर्षलता वसंतराव बुराडे व २) मिलिंद अंबादास कुबडे यांच्या सारांश पत्राची दोन्ही बाजूची झेरॉक्स प्रत मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०६.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०६.२००९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

उमेदवाराने अर्जान्वये / सारांशपत्रान्वये दिलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीची वैयक्तिक तपशीलासंबंधी असून त्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध असल्याचे आढळून येत नाही. आपण उमेदवारांच्या खाजगी व गोपनीय स्वरुपाच्या माहितीची मागणी केली आहे. कोणताही स्पर्धक उमेदवार जेव्हा आयोगाकडे आपला अर्ज सादर करतो त्यावेळेस सदर माहिती ही त्या उमेदवाराने आयोगाकडे सादर केलेली असून सार्वजनिक रित्या प्रसिध्द करण्यासाठी दिलेली नसते. अशा रितीने आयोग व उमेदवार यामध्ये विश्वासाश्रित नाते निर्माण होते. अशी माहिती उमेदवाराने आयोगाकडे विश्वासार्हतेने दिलेली असून गोपनीय स्वरुपाची असते. ती प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचू शकते व त्या व्यक्तीच्या जीवीतास किंवा शारिरीक सुरक्षीततेस धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम क्र. ८ (१) (d) (e) (g) (j) नुसार आपण मागितलेली त्रयस्थ व्यक्तीविषयीची खाजगी व गोपनीय स्वरुपाची माहिती पुरविणे आयोगास शक्य होणार नाही.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिलेली माहिती मान्य नाही. म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, हर्षलता वसंतराव बुराडे व मिलिंद अंबादास कुबडे या उमेदवारांनी अपंगाकरिता आरक्षीत असलेल्या पदाकरिता सादर केलेल्या सारांश पत्राची छायाप्रतीची मागणी केली होती. त्रयस्था पक्षाची माहिती, अपीलकाराने मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (d) (e) (g) (j) अनुसार नाकारली. महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या कामकाजाबाबतच्या आक्षेपाची शहानिशा करण्याचीबाब राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले

असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६६३/०२**

**श्री. सुरेश सुदामराव गायकवाड**
**रा.यशवंत नगर मुरूम**
**ता.उमरगा, जि.उस्मानाबाद. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शायकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०३०.**

**जन माहिती अधिकारी तथा सह संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शायकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०३०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुरेश गायकवाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.१२.२००८ रोजी अर्ज करुन,

श्री. एम.के.चवळे, सहाय्यक, बांधकाम व पाणी पुरवठा पर्यवेक्षक न. प मुरुम यांची बेकायदेशीर नेमणूकीबाबत काय कार्यवाही झालेली आहे याबाबत न प प स/मा.आधि/प्र.क्र.१४९/स.क्र.६६७२ (६०)/२००८/का-२४ अन्वये अहवालानुसार कोणती कार्यवाही झालेली आहे आणि याबाबत सदर पदे निवडमंडळ किंवा अन्यमंडळाकडून भरणेबाबत निर्देश दिले आहेत? यासंबंधी माहिती मिळणे बाबत व पत्राची झेरॉक्स प्रत मिळणे बाबत.

जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

दि.०२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयातील अभिलेखावर उपलब्ध असल्यास ती अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१३.०४.२००९ रोजी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.एम.के.चवळे, सहाय्यक बांधकाम व पाणी पुरवठा पर्यवेक्षक नगरपरिषद मुरुम यांच्या नेमणुकीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. याबाबत मुख्याधिका-याकडील अहवाल प्रतिक्षाधीन होता. असे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी मुख्याधिका-यांनी सादर केलेला दि.२०.०२.२००९ च्या अहवालाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६६४/०२**

**श्री. हिरासिंग गुलाबसिंग चंदेल**
**निशांत वैभव नगर, जिंतूर रोड,**
**परभणी ४३१ ४०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हिरासिंग चंदेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०९.२००७ रोजी अर्ज करुन, राजपुत भामटा संदर्भात माहिती कळविणे, जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अधिका-याकडून टाळाटाळ केली जाते त्यासाठी उपाययोजना कळविणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन दि.१६.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उप विभागीय अधिकारी, महसूल उप विभाग हिंगोली यांनी "राजपूत भामटा" जातीचे प्रमाणपत्र नाकारले असल्याने त्यासाठी उपाययोजना माहिती मागीतली होती. उप विभागीय अधिका-यांनी जातीचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारले. अपीलकाराच्या दि.१६.०९.२००७ च्या अपील अर्जाची मंत्रालयातील सामाजिक न्याय विभागाने दखल घेतली नाही. म्हणून सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिकारी कोण आहे याचा बोध होत नाही. अपिलीय प्राधिका-यांनी अपील अर्जाची दखल घेतली नाही किंवा निकालही दिला नाही असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. उप विभागीय अधिकारी, हिंगोली यांनी "राजपूत भामटा" जातीचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारले आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, उप विभागीय अधिका-याच्या सदर आदेशाविरुध्द अपीलकाराने सक्षम प्राधिका-याकडे म्हणजे विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रथम अपील दाखल करुन दाद मागावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८१/०२**

**श्री. सुभाष चिं.महाजन**
**पी-४/३२/६, विठ्ठल नगर,**
**एन २, सिडको, औरंगाबाद ४३१ ००३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत परिवहन,**
**एस्टेला बॅटेरिज़ बिल्डींग,**
**तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,**
**माटुंगा, मुंबई ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत परिवहन,**
**एस्टेला बॅटेरिज़ बिल्डींग,**
**तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,**
**माटुंगा, मुंबई ४०० ०१९.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुभाष महाजन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, कार्यकारी अभियंतापदाकरिता गुणवतेनुसार एकूण ७८ उमेदवाराची यादी तयार करुन त्यांना मुलाखतीकरिता बोलावण्यात आले. सदर उमेदवारांना लेखी, तांत्रिक, अपटीटयुड तसेच तोंडी मुलाखतील प्राप्त झालेल्या गुणाची उमेदवार निहाय माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (j) अनुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. अपीलकारास तसे दि.१२.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन तसे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास

दि.२३.०३.२००९ रोजी कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कार्यकारी अभियंता पदाकरिता मुलाखती घेतल्या एकूण ७८ उमेदववारांची यादीची प्रत, तसेच सदर उमेदवारांना लेखी, तांत्रिक, अपटीटयुड, तोंडी मुलाखतील प्राप्त झालेल्या गुणांची उमेदवारनिहाय माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (j) अनुसार माहिती नाकारली आहे. सदर दोन्ही अधि-यांची कृती योग्य नाही. उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (j) चा आधार घेउन सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती नाकरता येणार नाही. कार्यकारी अभियंता पदाच्या निवडप्रक्रियेतील पारदर्शकतेच्या दृष्टीने अपीलकारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८२/०२**

**श्री. डॉ.एम.एच.सिसोदिया**
**३०, चैत्रबन कॉलनी, माहाबळ,**
**जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आरोग्य सेवा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्राशासकीय अधिकारी**
**आरोग्य सेवा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एम.एच.सिसोदिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०२.२००९ रोजी अर्ज करुन, बदलीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास कोणती माहिती हवी आहे, याबाबत कोणताही स्पष्ट बोध होत नसल्याने त्याबाबतची माहिती पुरविणे शक्य होत नाही. याकरिता कार्यालयीन वेळेत कार्यालयात संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२१.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

विषयांकित प्रकरणी संदर्भाधी अर्जात नमुद केल्याप्रमाणे आपणास शासनाचे पत्रान्वये कोणताही पत्रव्यवहार प्राप्त झालेला नसल्याचे अवगत केलेले आहे. तथापि, या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ च्या व ३ अन्वये संबधितांनीही आपल्याशी पत्रव्यवहार केलेला असल्याचे दिसून येतो.

तथापि, आपण मागणी केलेल्या माहितीतील या संचालनालयाशी संबंधित असलेली माहिती आपणास हवी असल्यास अथवा या कार्यालयात येवून प्रत्यक्षरित्या उपस्थित राहून अवलोकन करावयाची असल्यास ती आपणास उपलब्ध करुन देता येईल. तथापी त्या करिता आपण तारीख व वेळ या कार्यालयाशी संपर्क साधून निश्चित करुन घ्यावी. सदर बाब यापुर्वीही आपणास अवगत केलेली असुन ही अंतिम संधी आपणास देण्यात येत आहे असे अपीलकारास कळविण्यात आले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने त्यांना वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकीत्सा) या विशेषतज्ञ पदावर पदोन्नतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. अपीलकारास नक्की कोणती माहिती हवी आहे याबाबत बोध होत नाही. अपीलकाराचे त्यांच्या पदोन्नतीबाबत ग्रा-हाने आहे. सदर प्रकरणी कार्यालयात उपस्थित राहून अपीलकारांनी माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दि.१२.११.२००९ पूर्वी अपीलकारास कळविले होते. अपीलकार माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. अपीलकारास आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ दि.०१.०८.२००१ पासून देण्यात आला आहे असा लेखी अहवाल जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर केला. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८३/०२**

**श्री.नगराज ज. पाटील**
**१८२, भिकमचंद जैन नगर,**
**जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**दुग्ध विकास खाते (पदुम)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी**
**दुग्ध विकास खाते (पदुम)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.नागराज पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०२.२००९ रोजी अर्ज करुन, जळगांव जिल्हा सहकारी दुग्ध उत्पादक संघाबाबत एकूण आठ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुध्दा क्र.१, ३, ५ व ७ बाबत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन दि.२५.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.म.ता.कांबळे यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अपीलकारास मुध्दा क्र.१, २, ३, ४, ७ व ८ बाबत कार्यासनात उपलब्ध असलेल्या टिप्पणी, पत्रव्यवहार व इतर अनुषंगीक कागदपत्राच्या छायाप्रती एकूण ८४ प्रती अपीलकारास दि.०३.०३.२००९ रोजी पुरविल्या. अर्जातील मुध्दा क्र.५ हा जळगाव जिल्हा सकारी दूध उत्पादक संघाशी संबंधीत असल्यामुळे या मुद्याच्या अनुषंगाने त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. तसेच अर्जाची प्रत जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), वरळी, मुंबई विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), नाशिक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असल्याचे अपीलकारास कळविले. अर्जातील मुध्दा क्र. ६ व ८ कृषी व पदूम विभाग मंत्रालय कार्यालयाशी संबंधीत असल्याने अर्जाची प्रत त्या विभागाकडे जन माहिती अधिका-यांनी पाठविली. अपीलकाराने माहिती पोटी रू.१६८/- व टपाल खर्च रू.१२०/- असे एकूण रू.२८८/- कोषागारात भरुन त्याची पोच सादर केल्यानंतर अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८४/०२**

**श्री.नगराज ज. पाटील**
**१८२, भिकमचंद जैन नगर,**
**जळगांव.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पशुसंवर्धन व दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी**
**पशुसंवर्धन व दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.नागराज पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०८.२००९ रोजी अर्ज करुन, जळगाव जिल्हा दुध संघाचा भ्रष्टाचाराबाबत एकूण १३ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती सह निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) महाराष्ट्र राज्य वरळी, मुंबई व विभागीय उप निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांच्याशी संबंधीत असून अर्जाची प्रत त्यांच्याकडे पाठवून सदर कार्यालयाकडून आवश्यक माहिती परस्पर प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी, अपीलकाराने मागणी केलेल्या पत्राच्या एकूण चार छायाप्रती अपीलकारास दि.०१.१०.२००८ च्या पत्रासोबत पुरविल्या. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. मागणी केल्याप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे नमुद करुन प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०३.२००९ च्या

पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जळगाव जिल्हा दुग्ध संघातील भ्रष्टाचाराबाबत अपीलकाराने अनुषंगीक बाबीची माहिती मागीतली आहे. अपीलकाराच्या अर्जातील मुद्याबाबत शासनाकडील उपलब्ध कागदपत्र अपीलकारास तपासणीकरिता उपलब्ध करुन दिली. त्यानंतर आवश्यक कागदपत्र जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली. संबंधीत प्राधिकरण विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), वरळी, मुंबई व सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), वरळी, मुंबई यांचेशी संबंधीत माहिती त्या कार्यालयाने अपीलकारास पुरवावयाची आहे. अपीलकाराच्या अर्जाची प्रती संबंधीताकडे हस्तांतरित केल्या आहेत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले.

माहिती अधिका-याकडे प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती किंवा माहितीचा भाग अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असेल तर तो अर्ज, माहिती अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (३) अन्वये कोणत्याही परिस्थितीत ५ दिवसात त्या संबंधीत प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावा व अर्जदारास तत्संबंधी सूचना द्यावी. कलम ६(३) मध्ये अन्य प्राधिकरण (Another Public Authority) याबाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. अशाप्रकरणी ज्या माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झालेला आहे. त्यांनी स्वत:च्या प्राधिकरणाशी संबंधी माहिती पुरवून अर्जदारास इतर मुद्यासंदर्भात संबंधीत प्राधिकरणाकडे वेगळे अर्ज करण्याचे सुचवावे, अशा अशयाचे मार्गदर्शन केंद्र शासनाच्या मिनीस्ट्री ऑफ पर्सोनेल

पब्लिक ग्रिव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स, डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ॲन्ड ट्रेनिंग यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्र.१०/२/०८ आर आर, दि.१२.०६.२००८ अन्वये प्रस्तूत करण्यात आले आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी नियमानुसार अपीलकारास माहिती दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८५/०२**

**श्रीमती. भागीरथीबाई टाकसाळी**
**रा.१६, सीताराम सदन रामनगर,**
**फायर ब्रिगेड मागे, औरंगाबाद.**
**मु.पो.ता.जि.औरंगाबाद. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा रजिस्ट्रार जनरल,**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप रजिस्ट्रार,**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई,**
**मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती. भागीरथीबाई टाकसाळी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०५.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकाराच्या जमीनीवर तोतळा यांनी बांधलेल्या बंगल्याबाबत मा.उच्च न्यायालयाने स्टे ऑर्डर दिल्या प्रकरणी अनुषंगीक माहिती मागीतली होती. मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार नियम, २००६ प्रमाणे अपीलकाराने विहित नमुन्यात अर्ज केला नाही. रू.१२/- चे कोर्ट फी स्टॅम्प लावले नाही. पोस्टाचे टिकीट लावलेला स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफापा अर्जासोबत पाठविला नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.०५.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-याने माहिती नाकरली असल्याच्या कारणावरुन दि.०६.०७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, याचिका क्र.५०४४/९९ संबंधी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयासंबंधी, कायदेविषयक सल्याच्या स्वरुपात माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मध्ये "माहिती" ची व्याख्या दिली आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने याचिका क्र.५०४४/९९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयासंबंधी कायदेविषयक सल्ला स्वरुपाची माहिती मागीतली होती. सदर बाब माहितीच्या व्याख्येत बसत नाही. यामुळे सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८६/०२**

**श्री.मनिष भ.अग्रवाल**
**ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनीचे पाठीमागे,**
**औरंगाबाद. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता**
**अधिक्षक अभियंता कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई**

**जन माहिती अधिकारी**
**अधिक्षक अभियंता कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मनिष भ.अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००८ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

आपल्या मंडळातर्गत असलेल्या कार्यकारी अभियंता, शहर विभाग, मुंबई येथे श्री.हरिष पाटील साहेब कार्यरत झाल्यापासुन अद्याप पर्यंत शहर इलाखा विभागातील चालु व झालेल्या तसेच शासकीय आर्थिक व्यवहार इतर प्रकरणाबाबत आपल्यापासुन वरिष्ठांपर्यंत सार केलेल्या तक्रारी अर्ज, उपोषण अर्ज, निवेदने व याबाबतीत वरिष्ठ अधिकारी व आपण केलेली कार्यवाहीची छायांकित प्रतित माहिती द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०२.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही. अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कार्यकारी अभियंता, शहर इलाखा विभाग, मुंबई येथे श्री.हरिष पाटील कार्यरत असल्यापासून चालू झालेली कामे, आर्थीक व्यवहार, तक्रार अर्ज, निवेदने त्यावर वरिष्ठ अधिका-यांनी केलेली कारवाई इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम चालू असल्याने सद्याच्या जागेतील कार्यालय इतरत्र हलविणेसाठी बराच कालावधी गेल्यामुळे तसेच कार्यालयातील दस्तऐवज इतरत्र हलविल्यामुळे अपीलकार यांना माहिती विहित कालावधीत पुरविता आली नाही. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयाचे पत्र क्र.अअ/मुंम/का.३ मा.अ.२००५/६२७३, दि.१९.११.२००९ अन्वये डाक नोंदीने पाठविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६८०/०२**

**श्री.शेख इब्राहिम शेख बडेमियाँ**
**चेअरमन न्यु भारत मजूर पेंटर्स ॲन्ड सेनेटरी**
**फिटर्स सहकारी संस्था,**
**नवी आबादी, घर नं.११०, नांदेड. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (सेवा)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मुंबई ४० ००३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मुंबई ४० ००३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शेख इब्राहिम शेख बडेमियाँ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०५.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.ए.एस.भोगे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्या विरूध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. याप्रकरणी आद्यापि अंतिम निर्णय झालेला नसल्याने सद्या माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०९.२००८ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. तसेच

अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.भोगे, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि. नांदेड यांच्या विभागीय चौकशीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. श्री.भोगे यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू होती. अपचा-यास दोषारोपत्र देणे त्यावरील अपचा-याचे अभिवेदन प्राप्त होणे इत्यादी अपीलकारास माहिती देण्यात आली होती. श्री.भोगे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.नांदेड यांना शासन आदेश, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.एस.९२/१००७/सीआर २४५/सेवा-६, दि.११.११.२००८ अन्वये "ठपका" ठेवण्याची शिक्षा देण्यात आली आहे. सदर आदेश अपीलकारास दि.२४.११.२००९ रोजी पत्रान्वये पाठविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६७९/०२**

**श्री.संदीपान ग्या. सोमवंशी**
**एच.पी.शिंदे, विलासराव देशमुख मित्र मंडळ,**
**शुभश्री कॉलनी, घर नं.९९५,**
**एन-६ सिडको, औरंगाबाद.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संदीपन सोमवंशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०६.२००७ रोजी अर्ज करुन,

१. २% आरक्षणातील गाळयाच्या ताबा पावल्या / कर्मचा-यांना सेवानिवास स्थान मालकी हक्काने विक्री करण्यास शासनाने दिलेल्या आदेशाच्या सर्व सत्य प्रत देणे व प्राधिकरणाने मंडळाला सेवानिवासस्थान मालकी हक्काने विक्री करण्यास दिलेल्या आदेशाच्या सर्व सत्स प्रत देणे.

२. मंडळ औरंगाबाद अस्तित्वात आल्यापासूनची सर्व माहिती देणे २% ची मंडळाच्या कर्मचा-यांना अधिकाराचा दुरउपयोग करून चुकीच्या दिशाहिनपध्दतीने कमी किंमतीत विक्री केलेल्या सेवा निवास्थानाची आमलबाजवणी व २% शासणाच्या आरक्षणावर मंडळाने गाजवलेली हुकमत मोडीत काढण्यासाठी.

३. शासनाच्या आदेशाने एकुण किती सेवानिवासस्थान विक्री केले त्याची पूर्ण यादी.

४. शासणाच्या व प्राधिकरणाच्या आदेशाशिवाय म्हाडाकडून प्लॉट व घर घेतलेले कर्मचा-यांची स्वतंत्र यांदी देणे गाळे योजना विहाय. प्रयोजन: - २% गाळा घेण्यासाठी व मंडळाचा व प्राधिकरणाचा पारदर्शक कारभाराची पहाण्यासाठी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत आवश्यकती माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.२३.०७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, गृहनिर्माण मंडळ, औरंगाबाद कार्यालयातील २% शासनाच्या आरक्षणातील गाळ्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, औरंगाबाद यांनी अपीलकारास ७ दिवसात माहिती पुरवावी असे दि.१३.०९.२००७ रोजी आदेश पारित करून जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, औरंगाबाद मंडळ यांनी त्यांचे पत्र क्र.४७८७ दि.०३.१०.२००७ अन्वये अपीलकारास माहिती पुरविली असल्याचा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करून प्रतिपादन केले. सदर लेखी अहवालाचे अवलोकन केले असता अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६७४/०२**

**श्री. ए.एस.केसरकर**
**मा.समाजकल्याण अधिकारी गट अ,**
**यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, लातूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिक न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.ए.एस.केसरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.११.२००८ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

१. अपंग व्यक्ति अधिनियम, १९९५ (P.W.D. Act, १९९५) नुसार 'आयुक्त' हे पद तयार करण्यात आले व त्यानुसार आयुक्तांची नेमणून करण्यात आली. तदवतच मुख्यालयापासून जिल्हा स्तरापर्यंत अपंगांसाठी कार्यरत असणारा कर्मचारी वर्ग कसा असावा व अशा कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता काय असावी याबाबत शासनाकडे प्रस्तावित केलेल्या प्रस्तावाची प्रत मिळावी.

२. 'उप आयुक्त', अपंगकल्याण हे पद निर्माण केलेले आहे त्या शासन निर्णयाची प्रत मिळावी.

३. जिल्हा स्तरापासून आयुक्त, अपंगकल्याण पदापर्यंत कोणती विविध पदे प्रस्तावित केलेली आहेत व सदर पदांनुसार या प्रस्तावित केलेल्या पदांना दिलेल्या कामाची सूची व या पदांची शैक्षणिक अर्हता याबाबतची माहिती मिळावी.

४. सध्या कार्यरत असलेल्या व आयुक्त अपंगकल्याण यांच्या अधीनस्त असलेल्या विविध पदांची माहिती व त्यांचेकडे असलेले कामाची सूची सविस्तरपणे मिळावी व त्यांची शैक्षणिक अर्हता याबाबतची माहिती मिळावी.

५. अपंगांच्या विविध योजनांवर २००५ ते २००८ अखेरचे माहे मार्चचे आयुक्त, अपंगकल्याण स्तरावरील खर्चाचे विवरण पत्र (Statment) मिळावे.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर प्रकरण माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते . सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आयुक्त अपंग कल्याण कार्यालयातील विविध पदाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता उत्तरवादी अनुपस्थित होते. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती पैकी ८०% माहिती प्राप्त झाली असल्याने व्दितीय अपीलावरील

सुनावणीचेवेळी अपीलकाराने प्रतिपादन केले. तसेच सदर प्रकरण बंद करण्यात यावे अशी अपीलकाराने आयोगास विनंती केली. सदर प्रकरणी अपीलकारांची विनंती लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६७३/०२**

**श्री. ए.एस.केसरकर**
**मा.समाजकल्याण अधिकारी गट अ,**
**यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, लातूर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिक न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.ए.एस.केसरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

सद्यस्थितीतील आयुक्त, अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयातील व अधिनस्त असलेले राज्यातील राजपत्रित वर्ग १ अंपग वर्ग २ अधिकारी यांची पुढील प्रमाणे माहिती मिळावी.

१. अधिका-यांचे नाव

२. पद

३. शैक्षणिक अर्हता

४. सोपवलेली कार्यसूची

५. राजपत्रित पदावर आल्याची तारीख व

६. सध्या कार्यरत असलचे ठिकाण

७. पदे रिक्त असल्यास कोठे व कधीपासून रिक्त आहेत इत्यादी माहिती मागीली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते . सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आयुक्त अपंग कल्याण कार्यालय, पुणे येथील गट अ व गट ब मधील अधिका-यांची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिल नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी ८०% माहिती प्राप्त झाली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकाराने प्रतिपादन केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता उत्तरवादी अनुपस्थित होते. ८०% माहिती मिळाली असल्याने प्रकरण बंद करण्यात यावे अशी अपीलकाराने आयोगास विनंती केली. अपीलकाराची विनंती लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.११.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६७५/०२**
**अपील क्र.२००९/३६७६/०२**

**श्री. विनोद देशमुख**
**नांदेड हाउंसिंग सोसा,**
**६०, विजयनगर, नांदेड -०२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विनोद देशमुख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

मराठवाडयातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील दि.२५.०५.१९६७ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना शासकीय कर्मचारी संबोधण्यात येवुन अद्यावत सर्व फायदे लागु करणे बाबतचे पत्रान्वये मा.ना.विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, मा.ना.आर.आर.पाटील, उपमुख्यमंत्री, मा.ना. पतंगरावजी कदम, सहकार मंत्री, मा.ना.हर्षवर्धन पाटीन, पणनमंत्री, मा.ना.जयप्रकाशजी दांडेगांवकर-सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग राज्य मंत्री आणि मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ३२ यांना वेळोवेळी पत्र देवुन त्या पत्रावर आपल्या कार्यालयास काय संकेत दिले त्या पत्रकाची छायांकित व साक्षांकित प्रत तसेच त्या पत्रकावर आपल्या कार्यालयातर्फे केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर माहिती सहपत्रकासह साक्षांकित व छायांकित प्रती पुरविण्यात यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुढीलप्रमाणे माहिती दिली.

मराठवाडयातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील दि.२५.०५.१९६७ नंतर नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना शासकीय कर्मचारी संबोधून अद्यावय सर्व फायदे लागू करण्याबाबत मा.मुख्यमंत्री मा.उपमुख्यमंत्री/मा.मंत्री (पणन)/मा.मुख्य सचिव यांना आपण लिहिलेले अर्ज पणन संचालक सेट्रल बिल्डींग, पुणे-१ यांच्याकडे पुढील उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. तरी याबाबत आपण पणन संचालकांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा तसेच अपील प्राधिका-याबाबतही त्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.०५.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकार यांनी कोणत्या कालावधीतील कोणी कोणास संदर्भीत केलेली कागदपत्रे याचा अपीलकाराने स्पष्ट उल्लेख केलेला नाही. यामुळे पत्रव्यवहार शोधणी जिकीरीचे होते. वेळोवेळी प्राप्त झालेले अर्ज योग्य त्या कार्यवाहीसाठी संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांकडे पाठविण्यात आल्याचे जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी माहिती पुरविण्यास दिरंगाई झाल्याचा मुध्दा अपीलकारांनी उपस्थित केला. सकृतदर्शनी या प्रकरणामध्ये दिरंगाई झाल्याचे स्पष्ट होन नाही असे नमुद करून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील खारीज केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मराठवाडयातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील नियुक्त केलेल्या कर्मचा-याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविलेली दिसून येत नाही. सदर दोन्ही

अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र.अपील/२००९/३७१७/०२

श्री. करीमखा सरदारखा पठाण -----अपीलार्थी
मेवाती मुसलमान पंच, कसाली मोहल्ला मोतीटेक,
अमळनेर, जिल्हा जळगांव.

विरुध्द

१. सचिव -----उत्तरवादी
मा.मुख्य माहिती आयुक्त कार्यालय
राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई ३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
मा.मुख्य माहिती आयुक्त कार्यालय
राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. करीमखा सरदारखा पठाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/०३/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर Video Conferncing वर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या कार्यालयात दि. ०३/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणा-या अपीलाचे प्रमाण मोठे असून प्रलंबित अपीले निकाली काढण्याच्या दृष्टीने राज्य माहिती आयोगाच्या नाशिक खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक २९/७/२००८ रोजी आयोजित करण्यात आला होता.

१. अपीलार्थी यांचे अपीलाची नियमाप्रमाणे नोटीस न काढता दि. २९/७/०८ रोजी ज्या नियमान्वये अपीलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात आले त्या नियमाची माहिती अपीलार्थीनी मागितली होती.

२. तसेच जी अपीले प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी मान्य केल्यानंतर सुध्दा आयोगाकडून फेटाळण्यात आले यावरुन प्रथम अपिलीय अधिकारी पण अकार्यक्षम ठरत नसल्यास कोणत्या नियमान्वये

३. औरंगाबाद माहिती आयुक्त एका दिवसात फक्त पाच अपीले निकाली काढतात. विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत एका दिवसात पन्नास द्वितीय अपीले निकाली काढण्यात येतात. यावरुन औरंगाबाद माहिती आयुक्त हे अकार्यक्षम ठरत नसल्यास कोणत्या नियमान्वये याबाबत अपीलार्थींनी माहिती मागितली होती. याबाबत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

राज्यात कार्यरत राज्य माहिती आयोग/ मुख्य माहिती आयोग यांचे **Status Independent** आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे द्वितीय अपीलाचे प्रलंबित प्रमाण मोठे आहे. राज्यातील नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने विशेष अपील निर्गत कार्यक्रम आयोजित करुन द्वितीय अपीले निकाली काढण्यात आली. राज्य माहिती आयोगाकडील प्रलंबित अपीलाचे प्रमाण मोठे असल्याचे लक्षात घेऊन जास्तीत जास्त द्वितीय अपीले निकाली काढल्याबाबत आयोगाकडून विविध उपाययोजना अमलात आणणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणून विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अधिकात अधिक द्वितीय अपीले एका दिवसात निकाली काढण्यात येत आहेत. सदर कारवाई नियमास अनुसरुनच करण्यात येते. यामध्ये कांही गैर नाही. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक ३०/११/२००९

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७१२/०२**

**श्री.हेमंत माणिकलाल छाजेड**
**६, महावीर सोसा, मोहाडी रोड,**
**जळगांव ४२५ ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**६ वा माळा, मुख्यमंत्री सचिवालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**६ वा माळा, मुख्यमंत्री सचिवालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हेमंत छाजेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०३.२००८ रोजी अर्ज करुन, ०१.०१.२००८ रोजी सादर केलेल्या निवदेनावर केलेल्या कारवाईसंबंधी खालील ३ मुद्याची माहिती मागीतली होती.

१. सदर निवेदन आपल्या कार्यालयाला प्राप्त झाल्यावर त्यावर लिहिण्यात आलेली कार्यालयीन टिपण्णी व इतर सर्व पत्र व्यवहाराच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

२. शासनाचा महसूल वसूल न करुन शासनाची अर्थव्यवस्था डबघाईस आणून शासनाचा विश्वासघात करण्या-या संबंधित भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियामन्वये तात्काळ कार्यवाही करणे शक्य आहे अशा सर्व कायद्यांचे कलमांची व नियमांची माहिती तात्काळ पुरविण्यात यावी.

३. सदर वसुल न झालेला महसूल वसूल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनाची समग्र माहिती द्यावी.

अर्जातील विषय महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकाराचा अर्ज त्या विभागाकडे पुढील कार्यवाईकरिता हस्तांतरित केला. तसेच याबाबत अपीलकारास अवगत करण्यात आले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील अर्ज महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्याने त्यांचेकडे हस्तांतरित करण्यात येत असल्याचे अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिलेल्या निवेदनावर केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्याने अपीलकाराचा अर्ज त्या विभागाकडे पुढील आवश्यक कारवाईकरिता त्या कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आला तसे अपीलकारास कळविण्यात आले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अनुसार सदर प्रकरणी अपीलकाराचा अर्ज जन माहिती अधिका-यांनी महसूल व वन विभागाकडे हस्तांतरित केला आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी समर्पक कार्यवाही केली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/३७११/०२

**श्री.हेमंत माणिकलाल छाजेड**
**६, महावीर सोसा, मोहाडी रोड,**
**जळगांव ४२५ ००१.** .... अपीलकार

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिवालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिवालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अपीलकार श्री. हेमंत छाजेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०३.२००८ रोजी अर्ज करुन, ०१.०१.२००८ रोजी पाठविलेल्या निवेदनावर खालील ३ मुद्याबाबत माहिती मागीतली होती.

१. सदर निवेदन आपल्या कार्यालयाला प्राप्त झाल्यावर त्यावर लिहिण्यात आलेली कार्यालयीन टिपण्णी व इतर सर्व पत्र व्यवहाराच्या प्रती पुरविण्यात याव्यात.
२. शासनाचा महसूल वसूल न करुन शासनाची अर्थव्यवस्था डबघाईस आणून शासनाचा विश्वासघात करण्या-या संबंधित भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियामन्वये तात्काळ कार्यवाही करणे शक्य आहे अशा सर्व कायद्यांचे कलमांची व नियमांची माहिती मला तात्काळ पुरविण्यात यावी.
३. सदर वसुल न झालेला महसूल वसूल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनाची समग्र माहिती द्यावी.

अपीलकाराच्या मुळ अर्जातील विषय हा महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी, राज्यपाल सचिव कार्यालय यांनी अर्ज दि.०५.०४.२००८ रोजी महसूल व वन विभागाकडे पुढीलकार्यवाहीसाठी हस्तांतरित केला तसे अर्जदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०२ मे, २००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेला निर्णय उचित असून त्यात कोणताही बदल करण्याची आवश्यकता आढळू येत नाही असे अपीलकारास कळविण्यात आले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिलेल्या निवेदनावर केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्याने अपीलकाराचा अर्ज पुढील आवश्यक कारवाईकरिता त्या कार्यालयाकडे हस्तांतरित करुन अपीलकारास कळविले. तसेच सदर अर्जात त्यांनी विचारलेला मुद्या क्र.१ बाबत कळविण्यात आले होते की, राज्यपाल सचिव कार्यालयाच्या कार्यपध्दतीनुसार त्यांचा दि.०१.०१.२००८ चा अर्ज या कार्यालयाची कॉम्प्लीमेंटरी स्लिक क्र.०३/०८/M/७२ दि.१५ जानेवारी, २००८ अन्वये सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. त्यामुळे सदर अर्जावर कार्यवाही करणे महसूल व वन विभागाच्या अखत्यारितील बाब असल्याने श्री.हेमंत माणिकलाल छाजेड यांनी दि.२४.०३.२००८ च्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जात मुद्या क्र.२ व ३ बाबतची माहिती ही महसूल व वन विभागाकडून मागविणे क्रमप्राप्त होते, आणि म्हणुन सदर माहिती महसूल व वन विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावी अशी विनंती श्री.हेमंत माणिकलाल छाजेड यांना करण्यात आली होती.

जन माहिती अधिकारी, राज्यपाल सचिव कार्यालय यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०९/०२**

**श्री.मोहम्मद जुबेर**
**घर नं.२-६-६४९, (१-१६-६३),**
**माळीवाडा गल्ली, जूना बाजार,**
**औरंगाबाद ४३१ ००१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन)**
**आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, अबुल गफारखान मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (प्रशासन)**
**आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, अबुल गफारखान मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मोहम्मद जुबेर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. मा.प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून औरंगाबाद विभागातील प्रशीतन यंत्र चालकांच्या २००७, २००८ व २००९ बदलीसाठी प्रस्तावित यादीची प्रत.
२. २००७, २००८ व २००९ वर्षात औरंगाबाद विभागातील बदलीसाठी प्रस्तावित यादीवर आपल्याकडून झालेल्या कार्यवाहीची प्रत.

३. बदलींचे अध्यादेश २००६ व दुरुस्ती २००७ नुसार औरंगाबाद विभागातील बदलीचे अधिकार आपल्या कार्यालयाकडून विभागीय कार्यालयाकडे प्रदान करण्यात आल्याचे आदेशाची प्रत २००७, २००८ व २००९ प्रत्येक वर्षाची प्रत.

४. अध्यादेश २००६ प्रमाणे ६ वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यंत एकाच मुख्यालयावर कार्यरत असलेले प्रशितन यंत्र चालकांची यादी.

५. औरंगाबाद विभागात शासकीय दुध योजना औरंगाबाद येथे मागील १२ वर्षापासून कार्यरत असलेले प्रशितन यंत्र चालकांची नावाची यादी त्यांच्या सेवा रूजू काळा कालावधीच्या नोंदीनुसार.

मागणी केलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०८.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१७.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद यांनी अपीलकारास विनाशुल्क माहिती उपलब्ध करून द्यावी असे दि.१८.०८.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद कार्यालयातील बदलीविषयक अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे

अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०६/०२**

**श्री.हेमचंद्र ज.काळे**
**३१, समर्थ कॉलनी,**
**एम.जे.कॉलेज रोड,**
**जळगांव, ता.जि.जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हेमचंद्र काळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

जळगांव खुर्द ता.जि.जळगांव (महा) या गावातील गायरान फॉरेस्ट जमिन हया संस्था किंवा व्यक्तींना दिली त्यांची नावे, ज्या कायदया अन्वये दिली त्याचा तपशिल, त्या बदल्यात माननिय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाअन्वये वन जमिन आणि मोठी मध्यम व लहान झाडे-झुडपे याबाबत महाराष्ट्र शासनास दिलेल्या रक्कमेचा बाबनिहाय तपशिल, ज्यांच्या आदेशाअन्वये दिली त्यांचे नाम, पदनाम इत्यादिंचा तपशिल, रिक्त असलेली गायरान वन जमिन कोणास दयावयाची असल्यास त्याचा तपशिल इत्यादिंची सत्य माहिती मला संकलित व साक्षांकित करुन तात्काळ उपलब्ध करुन द्यावी. दिलेल्या वनजमिनीत वन विभाग, सामाजिक

वनिकरण विभाग आणि कृषि विभाग इत्यादिंनी कामकाज केले असल्यास त्याच्या खर्चासह तपशिल मला संकलित करुन तात्काळ पुरवावा.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जळगांव खुर्द ता.जि. जळगांव या गावातील गायरान जमिनीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज उप वनसंरक्षक, जळगांव यांचकडे, अपीलकारास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सूचनेसह जन माहिती अधिका-यांनी पाठविला. याबाबत अपीलकारास अवगत करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपीलकाराने उप वनसंरक्षक, जळगांव यांचकडे परस्पर संपर्क साधावा असेही अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७३६/०२**

**श्री.विशाल भोगे**
**रुम नं.३०६, बिल्डींग नं.१०१,**
**न्यु म्हाडा कॉलनी,**
**डॉ.आंबेडकर नगर, मानखुर्द,**
**मुंबई ४०० ०४३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता**
**(स्थापत्य) २ रा मजला, मुंबई मंडळ म्हाडा,**
**कालानगर, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**घाटकोपर विभाग, मुंबई मंडळ,**
**कलानगर, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.विशाल भोगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०६.२००९ रोजी अर्ज करुन, सेवा निवासस्थान इमारतीच्या सलग्न जागेतील श्री.ॲन्थोनी सॅबेस्टीन व त्यांची पत्नी हेलन यांनी अतिक्रमण केलेल्या २५०० चौ.फु.बांधकामाबाबत माहिती अ, ब, क, ड या चार मुद्याबाबत मागीतली होती. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन कारणावरुन अपीलकाराने दि.३०.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अर्जातील मुध्दा क्र.१ संबंधी अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीच्या नस्तीचे अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून प्रथम निरीक्षण करावे. निरीक्षण झाल्यावर अपीलकारास आवश्यक कागदपत्राच्या प्रती अपीलकारास पुरविण्यात येतील. अनधीकृत बांधकाम तोडण्याची कारवाई मिळकत व्यवस्थापक-३ मुंबई मंडळ या कार्यालयाशी संबंधीत असून या संदर्भात मिळकत व्यवस्थापक-३ मुं.मं.या कार्यालयाशी संपर्क साधावा. ॲन्थोनी सॅबेस्टीन व त्यांची पत्नी यांनी कार्यालयात सादर केलेल्या

कागदपत्राच्या अनुषंगाने विविध कार्यालयातून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाच्या प्रती अपीलकारास उपलब्ध करुन दिल्या. विषयाला अनुसरुन माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी सॅबेस्टीन व त्यांची पत्नी हेलन यांनी अतिक्रमण केलेल्या २५०० चौ.फु. बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी श्री.ॲन्थोनी व त्यांची पत्नी हेलन यांनी अनुधीकृतरित्या बांधकाम केले त्याविरुध्द अंतिम (Final Notice) नोटीस द्यावी. त्यानंतर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७३९/०२**

**श्री. संजय शिरोडकर**
**३२/२५४, सिध्दार्थनगर, रोड नं.१०,**
**गोरेगांव (प), मुंबई ४०० १०४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वास्तुशास्त्रज्ञ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**कक्ष क्र.४६९, तिसरा माळा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**कक्ष क्र.४६९, तिसरा माळा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संजय शिरोडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, म्हाडाने म्हाडाचा ठराव क्र.६२८० पास केला, त्याबाबतचे कागदपत्रक अथवा सिध्दार्थनगर गृहनिर्माण संस्थेने (पत्राचाळ)/ गुरु आशिष कंस्ट्रक्शन यांनी म्हाडाला सादर केलेल्या मुळ प्रस्तावाच्या कागदपत्राच्या छायांकित प्रती कृपया देण्यात याव्यात.

माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२९.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, म्हाडाने, म्हाडाचा ठराव क्र.६२८०, दि.०१.११.२००७ हा ठराव कुठल्या आधारावर पास केला त्याबाबतचे कागदपत्र, तसेच सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेने गुरु आशिष कंस्ट्रक्शन यांनी म्हाडाला सादर केलेल्या मुळ प्रस्तावाच्या कागदपत्राच्या छायाप्रती प्रमाणित करुन मिळणेबाबत मागणी केली होती. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१२.११.२००९ च्या पत्रान्वये खालीप्रमाणे माहिती पुरविली.

१. म्हाडाचा ठराव क्र.६२८०, दि.०१.११.२००७ ज्या बाब टिप्पणीच्या आधारावर आहे त्या बाब टिप्पणीची प्रत.
२. ठरावाची प्रत.
३. संस्थने सादर केलेल्या पुनर्विकास प्रस्तावाची कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६३/०२**

**श्री. डॉ.कनगासाबापती सुंदरम पिलाई**
**बी-१/१, नारायण पुजारी नगर,**
**अे.जी.ख्रान रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ (दक्षिण) विभाग इमारत,**
**३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ (दक्षिण) विभाग इमारत,**
**३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.डॉ.के.एस.पिलाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात सेवेत असलेल्या उमेदवाराकरिता Post Graduate च्या आरक्षीत असलेल्या जागाबाबत अनुषंगीक एकूण ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुध्दा क्र. १ बाबत १९९८ ते २००८ या कालावधीची माहिती पुरविली. उमेदवारांची नावे, पदनाम, पदस्थापना, कोणत्या अभ्यासक्रमाकरिता पाठविले होते. सद्या कोठे कार्यरत आहेत अशी सविस्तर माहिती पुरविली. उर्वरित मुध्दा क्र.२ ते ५ बाबतची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही असे अपीलकारास कळविले. अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०७.२००९ रोजी अपील दाखल केले. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुरविली आहे. प्रश्नोत्तर स्वरुपात

मागीतलेली माहिती माहितीच्या अधिकारात येत नाही. नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२८.०७.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले . यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील सेवेत असेलेल्या उमेदवारांना आरक्षीत असलेल्या पी.जी.च्या जागाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी पुरविली प्रश्नोत्तर स्वरुपात मागीतलेली माहिती माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती पुरविणे हे सदर व्याखेत येत नाही, असा मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ गोवा यांनी याचिका क्रक.४१९/२००७ मध्ये दि.०३.०४.२००८ रोजी निर्णय दिला आहे. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर अपीलकारास समर्पक उत्तर दिले असून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी पारित केलेल्या आदेशात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६४/०२**

**श्री. डॉ.कनगासाबापती सुंदरम पिलाई**
**बी-१/१, नारायण पुजारी नगर,**
**अे.जी.खान रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ (दक्षिण) विभाग इमारत,**
**३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ (दक्षिण) विभाग इमारत,**
**३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.डॉ.के.एस.पिलाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने, आरोग्यासाठी कार्यक्रम राबविण्याकरिता आरक्षीत ठेवलेले सर्व प्लॉट्स व इमारतीच्या यादीची प्रत व इतर अनुषंगीक १६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१२.०६.२००९ च्या पत्रानुसार अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांने अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकारास जन माहिती अधिका-यांने उपलब्ध माहिती पुरविली असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकालात काढण्यात येत आहे असे आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आरोग्य कार्यक्रम राबविण्याकरिता मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने आरक्षीत ठेवलेले प्लॉट्स व इमारतीबाबतची यादीची प्रत व इतर १६ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे कार्यालयातील उपलब्ध आवश्यकती माहिती दि.१२.०६.२००९ च्या पत्रान्वये पुरविण्यात आली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलातील कागदपत्राची तपासणी केली असता अपीलकारास माहिती पुरविण्यात आल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७५७/०२**

**श्री. जयंत गाडे**
**प्रेस्टिज रेसिडेन्सी,**
**ऑर्चिड ए विंग, रूम क्र.२०४,**
**वाघबिळ नाका, ठाणे. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शिक्षण शुल्क समिती,**
**३०४, ३ रा मजला, शासकीय तंत्र निकेतन,**
**४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**शिक्षण शुल्क समिती,**
**३०४, ३ रा मजला, शासकीय तंत्र निकेतन,**
**४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जयंत गाडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०१.२००९ रोजी अर्ज करून, डॉ.जे.जे.मगदुम होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयाच्या शिक्षण शुल्काची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास एकूण ५ मुद्याबाबत मुध्देनिहाय माहिती दि.०३ मार्च, २००९ च्या पत्रान्वये कळविली. अपूरी माहिती दिली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०६.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, डॉ.जे.जे.मगदुम होमीओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयाची यु.जी.व पी.जी. अभ्यासक्रमाच्या शुल्क निश्चिती व इतर अन्य चार मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकारास दि.०३.०३.२००९ च्या पत्रानुसार सर्व ५ मुद्यावर सविस्तर माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. पी.जी. अभ्यासक्रमांच्या शुल्काबाबत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने सांगीतले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पी.जी.अभ्यासक्रमाबाबत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७४२/०२**

**श्रीमती.प्रियंका वर्मा**
**रूम नं.११, टाटा इस्टीटयुट ऑफ सोशल सायन्स,**
**सायन ट्रोंम्बे रोड, देवनार, मुंबई ४०० ०८८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप महासंचालक**
**आस्थापना, महाराष्ट्र पोलीस मुख्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा महासंचालक**
**आस्थापना, महाराष्ट्र पोलीस मुख्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.प्रियंका वर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०९.२००८ रोजी अर्ज करून, माहितीच्या अधिकारात सादर केलेल्या सर्व अर्जदारांची नावे व पत्ते इत्यादि अपीलकाराने माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ऑक्टोंबर, २००५ पासून ऑगस्ट, २००८ पर्यंतच्या कालावधीत एकूण १, २२५ अर्ज कार्यालयात प्राप्त झाले. तथापि अपीलकाराने मागीतलेली अर्जदाराची नावे, पत्ते इत्यादी बाबतचा तपशिल, प्रस्तूत अधिनियमाच्या कलम ८(१) (ड) (छ) व (त्र) अन्वये अपीलकारास देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांने अपीलकारास दिलेल्या

उत्तराचे समर्थन करून दि.०८.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अनुसार कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जदाराची नावे व पत्ते देण्याची अपीलकाराने मागणी केली होती. अपीलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतली आहे. सर्व संबंधीत अर्जदाराच्या संम्मती शिवाय माहिती दिल्यास त्यांच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल (Unwaranted invasion of the privacy) त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी सर्व अर्जदारांची नावे, पत्ते अपीलकारास पुरविण्याचे अमान्य केले. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७१३/०२**

**श्री. अंबादास ल.मोरे**
**डॉ.के.डी.बुबा,**
**नाशिक रोड, देवळालीगांव ४२२ १०१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अंबादास मोरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०९.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र शासन जल आयोजन - जलनिती मध्ये जनहितापेक्षा राजकिय हिताला अधिक महत्व देत असुन महाराष्ट्र शासनाचे धोरण कायम दुष्काळी त्रुटीच्या खो-यातील जनहिताच्या विरुध्द निर्णय घेत असल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमुर्तीनी हाच विंनती अर्ज समजुन शासनाच्या धोरणा विरुध्द विशेष जनहित याचीका समजुन शासनाला मांजरपाडा वळण योजनेचे पाणी फेर नियोजन करुन नांदगांव तालुक्यासाठी पाणी उपलब्ध करुन देणे कामी शासनाला मुख्य न्यायमुर्तीना आदेश द्यावा अशी अपेक्षा आहे. त्रुटीच्या खो-यातील नांदगांव तालुक्यातील जनतेला न्याय मिळवुन द्यावा ही विनंती आहे.

अपीलकाराने मागीतलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २(च) मध्ये व्यख्या केलेली व उपलब्ध असलेली माहिती नाही. वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन, पृथकरण करणे आवश्यक आहे. अशा स्वरुपाची माहिती पुरविणे अभिप्रेत नाही असे जन माहिती

अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. तापी खो-यातील पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी शासन विविध प्रकारे प्रयत्नशिल आहे. गोदावरी खो-याच्या बाबत शासन पक्षपातीपणा करुन जास्त पाणी त्या खो-यास देत आहे ही अपीलकाराची भावना वस्तुस्थितीवर आधारित नाही असे नमुद करुन अपिलीय प्राधिका-यांनी दि.२८.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, त्रुटीच्या खो-यातील नांदगाव तालुक्यातील जनतेला न्याय मिळवून देणेबाबत व जलनितीबाबत इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. तापी खोरे हे ही त्रुटीचे खोरे आहे. म्हणून शासनाने तापी खो-यात वांजूळपाणी प्रवाही योजनेव्दारे ७७७४ द.ल.घ.फु व नर्मदा खो-यातील ५५९० द.ल.घ.फु पाणी उपलब्ध करुन देण्यास तत्वत: मान्यता दिल आहे. गोदावरी खो-यात मात्र ७४५ द.ल.घ.फु पाणी वळविण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे शासन गोदावरी खो-यात जास्त पाणी देत आहे ही अपीलकाराची भावना वस्तुस्थितीवर आधारित नाही. अपीलकारास दि.२४.१०.२००८, ०३.०१.२००९, १३.०४.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कार्यालयातील उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०७/०२**

**श्री. श्रीकांत ल. वाईकर**
**जिंतूर कॉलनी, सेलू जि.परभणी ४३१ ५०३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेव इमारत, ३ रा मजला,**
**सर पोचखानवाला रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०३०.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेव इमारत, ३ रा मजला,**
**सर पोचखानवाला रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०३०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.श्रीकांत वाईकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१२.२००८ रोजी अर्ज करुन,

जिल्हाधिकारी, परभणी यांनी दि.०३.०९.२००८ रोजी पाठविलेल्या चौकशी अहवालातील मुध्दा क्र.१ ची चुकीची चौकशी करुन खोटा अहवाल पाठविल्याबाबत दि.१४.११.२००८ गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी ठाकूर यांनी आपल्या कार्यालयातील पाठविलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाही बाबतची सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१७.०८.२००९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाबाबत दि.३१.०१.२००९ रोजी नंतर काय कार्यवाही झाली याबाबत अभिलेखावर उपलब्ध सर्व कागदपत्र १५ दिवासाचे आत अपीलकारास द्यावी असे

आदेश दिले.  त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जिल्हाधिकारी, परभणी यांनी पाठविलेल्या चौकशी अहवालाबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती.  जिल्हाधिकारी, परभणी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकारास पुरविण्यात आली आहे.  यामुळे अपीलकार समाधानी नाहीत.  संचालय, नगरपरिषद प्रशासन यांनी कागदपत्र विभागीय आयुक्तांकडे चौकशीकरिता पाठविली आहेत.  अहवाल प्रलंबित आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी विभागीय आयुक्तांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपीलकारास माहिती पुरविण्यात यावी.  तसे अपीलकारास कळविण्यात यावे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**<br>**दिनांक ३०.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०८/०२**

**श्री.चंद्रकांत बा.अडसुळे**
**शाहू चौक, लातूर.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक (आस्थापना)**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेव इमारत, ३ रा मजला,**
**सर पोचखानवाला रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०३०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेव इमारत, ३ रा मजला,**
**सर पोचखानवाला रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०३०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चंद्रकांत अडसुळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०४.२००८ रोजी अर्ज करुन, लातूर नगरपालिकेतील नगर अभियंता निवडश्रेणी श्री.डी.एस.चिद्रे यांना बदली आदेशाप्रमाणे रुजू करुन न घेणेबाबतच्या अपीलकाराचा आक्षेप व बदली आदेश रद्द करणेबाबतचे अपीलकाराचे निवेदन दि.२०.०२.२००९ वर केलेली कारवाई. नगर परिषद अभियंता श्रेणी "अ" या पदावरील नेमणूकीच्या अभियंत्यास नगर परिषद अभियंता निवडश्रेणी या वरिष्ठ व उच्च पदाचे कर्तव्य व अधिकार वापरुन अभियांत्रिकी विभागाचे कामकाज हाताळण्यासाठी सक्षम ठरवून परवानगी देवू शकणा-या प्राधिका-याचा तपशिल. प्रशासकीय कामकाज व कर्तव्य विहित मुदतीत पार पाडण्याच्या कसूरीबाबत शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबतची तक्रार करण्यासाठीचे सक्षम प्राधिका-याचा तपशिल इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी

दि.१५.०५.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१२.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांने दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील दि.२१.०७.२००९ रोजी फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लातूर नगरपालिकेतील अधिका-याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.१ व २ बाबत आद्याप निर्णय झालेला नाही. मुध्दा क्र.३ व ५ बाबत प्रश्नांची उत्तरे देण्याचे अधिनियमानुसार अपेक्षित नाही. अर्जातील मुध्दा क्र.४ नगर विकास विभाग व सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.१५.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संचालक, नगरपरिषद प्रशासन यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०२/०२**

**श्री.एम.व्ही.रुपारेलीया**
**ऐ/५०३, रश्मी उत्सव,**
**जांगीड इस्टेट जवळ, विजयपार्क,**
**मिरारोड (पू), ठाणे ४०१ १०७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एम.व्ही.रुपारेलीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०४.२००९ रोजी अर्ज करुन, एकूण ४ विविध मुद्यावर माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१४.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत यामुळ व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, एकूण चार मुद्याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराचा अर्ज दि.२७.१२.२००८ रोजी नगर विकास विभागाकडे पाठविला. नगर विकास विभागाने दि.२९.१२.२००८ रोजी गृह विभागास पाठविला. म्हणून सदर प्रकरणी पुढील पत्रव्यवहार त्या

विभागाकडे करावा. अपीलकाराने दि.१३.०४.२००९ रोजी केलेला ई-मेल अर्ज नगर विकास विभाग व गृह विभागास दि.१६.०४.२००९ रोजी पुढील कारवाईकरिता पाठविण्यात आला आहे. तरी पुढील पत्रव्यवहार त्या विभागाकडे करावा असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी अपीलकारास कळविले आहे.

अपीलकाराने अपेक्षीलेली माहिती ही ४ मुद्याची असून त्यातील मुध्दा क्र.११४ हे परिवहन विभागाशी संबंधीत आहेत. सदर क्र.१ व ४ मुध्दे परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई कार्यालयातील विविध माहिती अधिकारी यांच्या अखत्यारित येत आहेत. त्यामुळे उक्त अधिनियमातील कलम ६(३) अन्वये संबंधीत माहिती अधिका-यांना वितरित करण्यात आली असून त्यांच्याकडून अपीलकारास माहिती प्राप्त होईल असे जन माहिती अधिकारी तथा सह परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अपीलकारास दि.०३.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले.

अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. अशा प्रकरणी ज्या माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झालेला आहे, त्यांनी स्वत:च्या प्राधिकरणाशी संबंधीत माहिती पुरवून अर्जदारास इतर मुद्यासंदर्भात संबंधीत प्राधिकरणाकडे वेगळे अर्ज करण्याचे सुचवावे, अशा आशयाचे मार्गदर्शन केंद्र शासनाच्या मिनीस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रिव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स, डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ॲन्ड ट्रेनिंग यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्र.१०/०२/०८-आय आर, दि.१२.०६.२००८ अन्वये प्रसृत केले आहे. तरी माहितीकरिता अपीलकारास सर्व संबंधीत प्राधिकरणाकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१३२/०२**

**श्री. बाळकृष्ण दशरथ काळे**
**१३/४१, त्रिवेणी सह गृ.संस्था**
**ओशिवरा, न्यु लिंक रोड, जोगेश्वरी,**
**मुंबई ४०० १०२.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**भारतीय विधानभवनचे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**मुन्शीनगर, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी,**
**भारतीय विधानभवनचे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**मुन्शीनगर, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.बाळकृष्ण काळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०१.२००८ रोजी अर्ज करून, भारतीय विद्याभवनचे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाचे अनुदान मिळते का? इत्यादी एकूण १५ मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज विहित नमुन्यातील नसल्याने दप्तरी दाखल करण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०४.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१९.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याने केलेल्या कार्यवाहीचे समर्थन करून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१६.०३.२००९ रोजी तसे कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाचे अनुदान मिळते का? व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१६०/०२**

**श्री. अब्दूल गफूर**
**हॉटेल प्रेसिडेंट,**
**महाराष्ट्र नगर, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्‌टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्‌टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अब्दूल गफूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"झोपडपट्‌टी पुर्नवसन योजनेस सुधारीत आशयपत्र (Revised LOI) अद्याप जरी दिलेले नसले तरी सदर प्लॉट वरील विकासक - गजराज हौसिंग निर्माण प्रा.लि. यांनी गेली ४ महिन्यापूर्वीच २२५ चौ. फूटाचे बांधकाम अयोग्यरित्या २६९ चौ.फूट वाढविण्यास सुरुवात केली आहे.

आपल्याकडील केलेल्या तक्रारीवर आपण योग्य निर्णय घेउ शकत नसाल तर कृपया अशा अयोग्य आणि बेकादेशीर बांधकामावर तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणा-या

अधिकारी तसेच कार्यकारणी विभागांची नावे आणि पत्ते देण्यात यावे. आमची तक्रार योग्य व्यक्ती पर्यंत पोहचून योग्य कार्यवाही होण्याबाबत निश्चितता निर्माण होईल."

जन माहिती अधिका-यांनी दि.०२.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१८.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, नगर भु.क्र.६२९ (पै.) खेरवाडी, वांद्रे (पू) महाराष्ट्र नगर / आंबेडकर नगर येथे सुधारित आशयपत्र (Revised LOI) न देता करण्यात येत असलेल्या बांधकामावर प्रतिबंध उपाय योजना करणा-या अधिकारी तसेच कार्यकारीणी विभागाची नावे आणि पत्ते इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी खालीलप्रमाणे अपीलकारास दि.०२.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली.

महाराष्ट्र नगर, आंबेडकर येथील झोपडपट्टी पुनवर्सन योजनेअंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या योजनेसाठी संदर्भित वास्तुविशारदांनी शासनाच्या नवीन धोरणानुसार मिळणा-या २६९ चौ.फुअ चटई क्षेत्राचे पुनर्वसन गाळे बांधण्यासाठीचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर केला आहे व तो मान्यतेसाठी विचाराधीन आहे. तथापि त्याचे सुधारित आशयपत्र (Revised LOI) अद्याप देण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याच्याशी संबंधीत आपण मागविलेली माहिती देता येणे शक्य नाही.

अपीलकारास वरीलप्रमाणे सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली आहे. उत्तरवादीने दिलेल्या सदर माहितीने समाधान झाले नाही असा अपीलकाराने व्दितीय अपीलात नमुद केले आहे. उत्तरवादीने सदर प्रकरणी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने

त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०३/०२**

**श्री.राजेश जाधव**
**जाधव निवास, बायर (इं) कंपनी गेट,**
**नं.२, समोर, दगडी कंम्पाउंड, राम मारूती नगर,**
**बाळकुम, ठाणे (प) ४०० ६०८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक**
**प्रशासन, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय (म.रा.),**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सहा. पोलीस महानिरीक्षक**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय (म.रा.),**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजेश जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०१.२००९ रोजी अर्ज करून, सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर २८ महिन्याने उशिराने पदोन्नती देण्यात आली याबाबत मानीव तारिख मिळण्यासाठी दि.१०.०३.२००५ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

१. पोलीस उप निरीक्षक पदातील मूळ सेवाज्येष्ठतेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीसाठी आपल्या नावाचा सन २००० च्या निवडसमितीने प्रथम विचार केला होता. त्यावेळी निवडसमितीने 'अपात्र' ठरविल्याने आपणास सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आलेली नाही. तसेच सन २००२ च्या निवडसमितीने आपल्या प्रकरणाचा अधिक्रमित भागातून विचार केला असता त्यावेळीही आपणास

निवडसमितीने 'अपात्र' ठरविल्याने आपल्याला सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती दिलेली नाही.

२. तदनंतर आपले प्रकरण पुन्हा अधिक्रमित भागातून सन २००३ च्या निवडसमितीसमोर ठेवले असता आपणास निवडसमितीने 'पात्र' ठरविले म्हणून या कार्यालयाचे आदेश दि.०४.१२.२००४ अन्वये आपणास सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती दिलेली आहे.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२६.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर उशिराने पदोन्नती मिळाल्याने मानिक दिनांक देणेबाबत केलेल्या अर्जावरील कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.०३.२००९ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०१/०२**

**श्री. राजेश पी.तलरेजा**
**सेक्टर ४/बी-५/१०३,**
**शांतीनगर, मीरा रोड ४०० १०७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१२)**
**शैलेंद्र नगर, दहिसर (पू), मुंबई ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**उत्तर नियंत्रक कक्ष, मुंबई ४०० ०६८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.राजेश तलेरजा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०२.२००९ रोजी अर्ज करुन, बीट मार्शल / वाहतुक पो.अमलदार यांचा दहिसर चेकनाका येथे बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच दहिसर चेकनाका जवळ मिरारोड दिशेने वाहने पार्क असतात ती काढण्याकरिता काय कारवाई करण्यात आली. दहिसर चेकनाक्यावरुन जाणारे पाण्याचे टॅकर्स रस्त्यावर पाणी सांडत जात असल्याने अपघात होतात. म्हणून टॅंकर्सवर कायदेशीर कारवाई करण्याकरिता दिलेल्या अर्जावर काय कारवाई करण्यात आली. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने अपीलकारास माहिती दि.१०.०३.२००९ रोजी पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती बरोबर आहे असे नमुद करुन दि.०२.०५.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दहिसर चेकनाका येथील बंदोबस्ताबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.०३.२००९ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १८.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५७१/०२**

**श्री. कौस्तुभ द. गोखले**
**सिध्दिविनायक प्रसाद,**
**डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पू) ४२१ २०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**प्लॉट नं.सी-१४ व सी-१५,**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**प्लॉट नं.सी-१४ व सी-१५,**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.कौस्तुभ गोखले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०५.२००९ रोजी अर्ज करुन, श्रीमती येवलुबाई मायकल गलचाव चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या नावे सदर जागे पैकी १० एकर २० गुंठे ऐवढी जागा लाभांश म्हणून देण्यात येत आहे व ती त्यांच्या नावे वर्ग करण्यात आली आहे. सदर १० एकर २० गुंठे ऐवढी जागा ज्या सर्वे नंबर मध्ये देण्यात आलेली आहे त्याची नकाशासह मालकी दर्शविणारी संपूर्ण कागदपत्रे नकाशासह सत्यप्रतीमध्ये मिळावीत.

अपीलकारास कोणतीही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१५.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्रीमती.येवलूबाई मायकल गलचाव चॅरीटेबल ट्रस्ट यांचे नावे १० एकर २० गुंठे जागा वर्ग करण्यात आल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला वर्ग करण्यात आलेल्या सर्व्हे नंबरचे एकत्रिकरण करुन न.भू.क्र.४२०७ देण्यात आला. गाव दप्तरी कागदोपत्री धारक सदरी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नाव दाखल आहे. प्राधिकरणामार्फत १० एकर २० गुंठे जमिन लाभांश म्हणून श्रीमती. येवलूबाई मायकल गलचाव चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या नावे वर्ग झालेली नाही. सदर सर्व जमिन प्राधिकरणाच्या नावे व ताब्यात आहे असे जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर वस्तुस्थिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित वेळेत कळविलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग करणारी आहे. याकरिता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती लादण्याची कारवाई का? सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०३.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५६०/०२**

**श्री. जगदीश अमलानी**
**शॉप नं.१, ब्लॉक नं.१९/२०,**
**तळ मजला, शेनशहा टॉवर, सेक्टर १७ जवळ,**
**उल्हासनगर ४२१ ००३, ठाणे. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक उत्पादन शुल्क**
**१ ला मजला, मिठबंदर रोड,**
**चांदणी कोळीवाडा, ठाणे. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जगदीश अमलानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०४.२००९ रोजी अर्ज करुन, तळ मजला शेनशहा टावर, सेक्टर १७ जवळ उल्हासनगर, जि.ठाणे येथील दुकान क्र.१ ब्लॉक क्र.१९ व २० चे लायसन हस्तांतरित करण्याची मागणी अमान्य करण्यात आली. या संबंधीच्या फाईलची टिप्पणी, त्यावरील शेरे इत्यादी माहिती अनुषंगीक माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०८.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दुकान क्र.१ ब्लॉक क्र.१९ व २० चे लायसन हस्तांतरित करण्याचे नाकारल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याच्या कार्यालयातील कर्मचारी/अधिकारी लोकसभा निवडणूक कर्तव्यावर होते. कर्तव्यावरुन परत कार्यालयात हजर झाल्यावर अपीलकारास कार्यालयाचे पत्र क्र.केमाअ ११२००९/४२४९/क-१८, दि.३०.०६.२००९ च्या पत्रानुसार माहिती पाठविली. तद्नंतर अपीलकार स्वत: कार्यालयात दि.२९.०७.२००९ रोजी उपस्थित राहून माहिती स्वत: स्विकारली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १३.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७३४/०२**

**श्रीमती. प्रणाली धायलकर**
**२३/३९, दिसर्ली रोड,**
**बी.डी.डी. चाळ, एन.एम.जोशी मार्ग,**
**मुंबई ४०० ०१३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी सहा.कामगार आयुक्त,**
**कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा कामगार आयुक्त**
**कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.प्रणाली धायलकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करून, भारतीय नागरीकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालयाविरूध्द मा.सर्वोच्च न्यायालय, मुंबई मा.औद्योगिक न्यायालय, मा.सत्र न्यायालय, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाची माहिती व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध माहिती दि.२७.०७.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास पुरविली. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०३.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांने दिलेल्या माहितीचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालयाविरुध्द भारतीय नागरीकांनी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाची माहिती व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अर्जातील मुध्दा क्र.अ व ब कार्यालयाशी संबंधीत नसल्याने माहिती देता येत नाही. मुध्दा क्र. क बाबत रु.३०/- शुल्क आकारुन एकूण १५ पाने माहिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुरविली. तसेच व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७४१/०२**

**श्री. डॉ.कनगासाबापती सुंदरम पिलाई**
**बी-१/१, नारायण पुजारी नगर,**
**अे.जी.खान रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ (दक्षिण) विभाग इमारत,**
**३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ (दक्षिण) विभाग इमारत,**
**३ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.डॉ.के.एस.पिलाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०४.२००९ रोजी अर्ज करुन, त्यांच्या स्वत:च्या सेवाअभिलेख पुस्तकाच्या सर्व छायाप्रतीची मागणी केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (आय) चा आधार घेउन अपीलकारास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.२३.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०२.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०५.२००९ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, स्वत: च्या सेवाअभिलेख पुस्ताकच्या छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकार हे आरोग्य खात्याचे कर्मचारी आहेत. त्यांना सर्व माहिती ज्ञात असून सुध्दा केवळ प्रशासनाला त्रास देण्याच्या उध्देशाने त्यांनी माहितीच्या अधिकारांतर्ग अर्ज करण्याचे धोरण अवलंबिलेले आहे, असा जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतीपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या सेवा पुस्तकाबाबत सविस्तर माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून चार आठवडयाचे अता निशुल्करित्या पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६०/०२**

**श्री.एल.एन.नामदेव**
**पी.आर.के.पी.**
**३३, २ रा मजला, मोती भवन,**
**डॉ.डिसिल्वा रोड, दादर (प),**
**मुंबई ४०० ०२८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वन संरक्षक व संचालक**
**वन संरक्षक व संचालक यांचे कार्यालय,**
**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,**
**बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.वन संरक्षक (प्रादेशिक)**
**वन संरक्षक व संचालक यांचे कार्यालय,**
**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,**
**बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.एल.एन.नामदेव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०४.२००९ रोजी अर्ज करुन, वन विभागाच्या अधिका-यांची नावे, पदनाम, भ्रमण दूरध्वनी क्रमांक द्यावेत. अशी एकूण ८ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०६.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१७.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१०.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वन विभागातील अधिका-याबाबत तसेच इतर विविध विषयासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे मुध्देनिहाय माहिती दि.१७.०६.२००९ च्या पत्रान्वये विलंबाने पुरविली आहे. याबाबत अपीलकारास शास्ती लावावी अशी अपीलकाराने व्दितीय अपीलात मागणी केली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली आहे. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरिता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३ आठवडयाच्या आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७५५/०२**

**ॲड. रमण बी.जायभावे**
**सा.बा.वि.कार्यालयाजवळ,**
**शिवडी द्रुतगती न्यायालयासमोर,**
**झकारीया बंदर रोड, शिवडी,**
**मुंबई ४०० ०१५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था**
**मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी**
**श्रेणी-१, मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार ॲड. रमन जायभावे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करुन, भारत नगर, बांद्रा (पू) मुंबई ४०० ०५१ येथील सीटी सर्व्हे क्र.७६४३ (पीटी) सर्व्हे क्र.३७८ येथील टाटा कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्था लि.नोंदणी क्र. एमयुएम/एम एच अे डी बी / एच एच बी/ (टीसी) १२५६४/२००५-२००६ दि.२५.१२.२००५ बाबत एकूण ५ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२२.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, टाटा कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्था लि.मुंबई बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. टाटा कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दप्तराची पडताळणी करण्याची अपीलकाराने मागणी केली होती. आवश्यक असलेल्या दप्तराची नस्ती कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध होत नाही. यामुळे अपीलकारास दप्तराची पडताळणी करण्यास कागदपत्र उपलब्ध करुन देता येत नाही. अर्जातील मुध्दा क्र.२, ३, ४, ५ अन्वये संस्थेच्या पदाधिका-यांनी एम-२० या नमुन्यात दिलेली बंधपत्रे व्यवस्थापकीय समितीच्या निवडणूकीची कागदपत्रे, वार्षीक सर्वसाधारण सभेचे इतिवृत, सर्वसाधारण सभा व व्यवस्थापक समिती इतिवृत आणि लेखापरिक्षण अहवालाच्या प्रतिची अपीलकाराने मागणी केली आहे. सदरहू माहिती संस्था पातळीवरील असल्याने संस्थेकडून प्राप्त करुन घेउ शकता. त्याप्रमाणे संस्थेला सूचना देण्यात येत आहेत असे जन माहिती अधिका-याने अपीलकारास दि.०१.०८.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानंतरही अपीलकारास माहिती मिळाली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, टाटा कॉलनी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी संबंधीची कागदपत्र तसेच एम-२० बंधपत्राच्या प्रती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करुन द्यावे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६३७/०२**

**श्री.हरिश्चंद्र जोमा म्हात्रे**
**अे/५, लेन नं.८, सेक्टर नं.९,**
**सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल-वॉर्ड यांचे कार्यालय, एल.वाय.मार्केट, स.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. करनिर्धारक व संकलक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल-वॉर्ड यांचे कार्यालय, एल.वाय.मार्केट, स.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हरिश्चंद्र म्हात्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०९.२००९ रोजी अर्ज करुन, मेसर्स चंद्रप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्था लि. केळुस्कर मार्ग कुर्ला (प), मुंबई ४०० ०७० हया संस्थेचे अपीलकार सदस्य आहेत. बीलाचा दिनांक, रक्कम, रक्कम भरल्याचा दिनांक, मालमत्ता कराची रक्कम विलंबाने भरल्याबाबत आकारण्यात आलेल्या दंडाची सन १९९८ पासून ची रक्कम इत्यादी अपीलकाराने माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१८.१०.२००८ च्या पत्रान्वये सन २००३ पासून सन २००८ पर्यंतची बिलाची रक्कम, नोटीस फी अधिदानाची तारिख अपीलकारास पुरविली. अपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास संबंधीत कागदपत्राची तपासणी करण्याकरिता कागदपत्र प्रथम उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर उपलब्ध माहिती अपीलकारास पुरवावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या.

त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, चंद्रप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्था लि.बाबत मालमत्ता करासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सन २००३ पासून २००८ पर्यंतची माहिती अपीलकारास पुरविली. अपीलकारास अपुरी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मालमत्ता करासंबंधी संस्थेची सन १९९८ पासूनची उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६५८/०२**

**श्री.चंद्रकांत एस. बनसोडे**
**राहूल नगर, मामाचौक (नालंदा बुध्द विहारलगत,**
**रेल्वे स्टेशनजवळ), औरंगाबाद. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था)**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (आस्था)**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.चंद्रकांत बनसोडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. अँन्टी करप्शन कायद्याखाली न्यायालयातुन निर्दोष सुटका झालेल्या ज्या पोलीस उप निरीक्षकांनी त्यांना पोलीस निरीक्षक म्हणून प्रोमोशन मिळावे म्हणून पोलीस महासंचालक यांचेकडे उपरोक्त कालावधीत अर्ज सादर केले असतील त्या सर्व अर्जांची प्रमाणीत झेरॉक्स प्रत.

२. सदर अर्जावर आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे संदर्भात लिहीण्यात आलेल्या संपूर्ण कार्यालयीन टिपणींची प्रमाणीत झेरॉक्स प्रत.

३. सिटीझन चार्टर प्रमाणे अशा प्रकारचे प्रकरणांवर किती दिवसात कार्यवाही पूर्ण करावयास पाहीजे या बाबत ची माहिती.

४. सदरचे अर्जांवर काय निर्णय घेण्यात आले या बाबतची माहिती कृपया उपरोक्त अनु.क्र.१ ते ४ ची माहिती तात्काळ पुरविण्यात यावी.

पोलीस उपनिरीक्षक ते सहाय्यक पोली निरीक्षक पदी पदोन्नती, त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात येते. पोलीस उप निरीक्षक ते पोलीस निरीक्षक असे प्रमोशन होत नाही. तरी अपीलकारास कोणत्या पदाच्या पदोन्नतीबाबत माहिती हवी आहे ते समजून येत नाही. अपीलकाराने हवी असलेली माहिती सविस्तरपणे विचारावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१३.०३.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नती मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. श्री.सादीक शेख यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने अपीलकाराने माहिती नाकारली आहे. श्री.सादीक शेख, पोलीस उपनिरीक्षक यांनी पोलीस महासंचालकाकडे सादर केलेल्या विनंती अर्जाबाबत केलेल्या कारवाईची माहिती, अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६३०/०२**

**श्री.सज्जन ह.पाटील**
**वर्तकनगर स्नेहसागर सोसायटी,**
**बि.नं.६३, रू.नं. ३०७७,**
**वर्तक नगर, ठाणे ४०० ६०६. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन,**
**३ रा मजला, ८३ डॉ.ॲनि बेझंट रोड,**
**मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन,**
**३ रा मजला, ८३ डॉ.ॲनि बेझंट रोड,**
**मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सज्जन पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०६.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

श्री.सदगुरू सेवा मंडळ ठाणे नोंदणी क्र.एफ-७३०५ चे विश्वस्ताविरुध्द स्वयंप्रेरीत कलम ४१ (ड) प्रमाणे कार्यवाहीची आवश्यकता असल्याने धर्मादाय आयुक्त यांचे परिपत्रक २१७ प्रमाणे माहिती जा.क्र.४७१०/०६ दि.१६.११.२००६ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त ठाणे विभाग ठाणे यांनी मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे सादर करुन पुढील कार्यवाही सुरु करावी अशी विनंती कार्यालयातील निरीक्षण यांनी सादर केलेल्या चौकशीची सत्य प्रतीसह केली आहे. याबाबत काय कार्यवाही केली व प्रचलित आहे याची माहिती देणे बाबत.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त ठाणे यांनी पाठविलेल्या प्रस्तावाबाबत विश्वस्ताकडून खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलासा प्राप्त झाला आहे. त्यावर आवश्यकती न्यायीक कार्यवाही सुरु आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांच्या दि.१९.०५.२००५ च्या चौकशी अहवालावरील दि.१५.०७.२००५ चे शेरे - आदेश इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. सद्यस्थितीत सहाय्यक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे यांनी पाठविलेला अहवालास अर्ज क्र.९/०७ असून धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेसमोर सुनावणी सुरु असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. कलम ४१ (ड) अंतर्गत चौकशी चालू आहे. सदर प्रकरणात अपीलकार हे पक्षकार आहेत. सदर प्रकरणाबाबत त्यांना संपूर्ण माहिती आहे. असे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६२८/०२**

**श्री.राजेश बा.खेडेकर**
**६०१/ई, पेरिजिंकल सह.गृ.संस्था,**
**बेवळी पार्क, कनाकिया, मिरा रोड (पू),**
**ठाणे ४०१ १०७. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त**
**(आ गु वि), गुन्हे अन्वेषण विभाग,**
**पोलीस आयुक्त, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त,**
**(आ.गु.) गुन्हे अन्वेषण विभाग,**
**पोलीस आयुक्त, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजेश खेडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

मे कोकण महीला सहकारी पतपेढी मर्या. माझगांव मुंबई या पतसंस्थेतील आर्थिक गैरव्यवहारा संबंधी पुढील कायदेशीर कारवाई करणेस्तव मे.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था इ विभाग मुंबई यांनी आपल्या कार्यालयाकडे दि.०७.०१.२००८ रोजी तक्रार नोंदली आहे. या तक्रारीनुसार आपल्याकडून झालेल्या कार्यवाही संबंधी संपूर्ण कागदपत्र जाबजबाब इत्यादी कार्यालयीन नोंदीसह कागदपत्राची प्रत मिळणे.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारानुसार मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमाच्या कलम ८(१) (ज) अन्वये नाकारण्यात आली. यामुळे अपीलकाराने दि.१४.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीबाबत आद्यापी चौकशी चालू आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (ज) अन्वये अपीलकाराने मागणी केलेली माहिती नाकारण्यात आली असे नमुद करुन दि.२३.०३.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कोकण महिला सहकारी पतपेढी मर्यादित माझगांव येथील आर्थिक गैरव्यवहाराबाबत कायदेशिर कारवाई करण्यासंबंधी तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी चौकशी चालू असल्याने अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी, सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाल्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६३३/०२**

**श्री.ईम्तीयाझ अली शेख**
**२५/ब, संगम अपार्टमेंट,**
**२ रा मजला, हाथी महल,**
**वसई-ठाणे. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक**
**मुख्यालय, अप्पर पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**अप्पर पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ईम्तीयाझ शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून, पोलीस अधिक्षक ठाणे (ग्रामिण) यांचेकडे तक्रार अर्जावरील कारवाईची माहिती मागीतली होती. पोलीस अधिक्षक ठाणे यांनी केलेल्या चौकशीबाबतच्या दि.२०.१२.२००८ च्या अहवालाची प्रत, त्यासोबतच्या अपीलकाराच्या जबाबाच्या प्रती अपीलकारास पुरविण्यात आल्या आहेत. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम २ (च) मध्ये नमूद माहितीच्या व्याख्येनुसार केवळ उपलब्ध माहिती देण्याची तरतुद आहे. अपीलकाराच्या दि.०७.१०.२००८ च्या तक्रार अर्जा व्यतिरिक्त अपीलकाराचे इतर अर्ज प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे कोणतीही माहिती उपलब्ध करणे शक्य नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराचे रु.८०, ००, ०००/- लाखाचे नुकसान झाले. याबाबत वसई पोलीस ठाणे गुन्हा दाखल करत नाहीत अशी अपीलकाराने तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची अपीलकाराने माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी पोलीस अधिक्षक ठाणे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, वसई यांचेकडून चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करून दि.२०.०१.२००८ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन करता अपीलकार यांनी केलेल्या तक्रारीत काही एक तथ्य नाही. अपीलकार व गैरअर्ज दाराच्या जबाबाच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी आयोगास सादर करुन तसे प्रतिपादन केले. दि.२०.१२.२००८ च्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकारास देण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/३६३४/०२

श्री.चंद्रकांत जयराम दौंड
५०१/ कावेरी अपार्टमेंट,
संतोषी माता रोड, एच.डी.एफ.सी.बँकेजवळ,
कल्याण (प), जि.ठाणे ४२१ ३०१. .... अपीलकार

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव
सामाजिक न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
सामाजिक न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी

विवेचन

अपीलकार श्री.चंद्रकांत दौंड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१२.२००८ रोजी अर्ज करून, जातीपडताळणी संबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.२७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जातपडताळणी संबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहितीपोटी व टपालखर्च असे एकूण रु.३४/- चलनाने शासकीय कोषागारात भरुन चलनाची प्रत सादर करावी. अथवा दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानंतर अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४२५/०२**

**श्री. एम.जी.जॉन्सन**
**प्लॅट नं.बी-९,**
**प्रयाग प्रभाग कॉलनी,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त,**
**३ रा मजला, डॉ.ॲनि बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.एम जी जॉन्सन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१२.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, सेंट थॉमस मार थोमा सिरीयन चर्च, मुंबई नोंदणी क्र.डी २०३ (मुंबई) या ट्रस्टच्या गैरव्यवस्थापनाबाबत, सार्वजनिक न्यास अधिनियम / नियमाचे उल्लंघन होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने, तक्रारदारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे राज्य माहिती आयोगाकडे क्र.२३९७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत मागणीप्रमाणे कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात असे दि.१०.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने तक्रारादाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४२५/०२ ही तक्रार दाखल केली.

सेंट थॉमस मार थोमा सिरीयन चर्च, मुंबई या ट्रस्टच्या गैरव्यवस्थापनाबाबत तक्रारदाराने माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी तक्रारदारास माहिती पुरविली. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने यापुढेही सदर ट्रस्टच्या गैरव्यवस्थापनाबाबत केलेल्या कारवाईची तक्रारदारास वेळोवेळी माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी सदर तक्रारी संबंधी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १२.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४७४/०२**

**श्री. दिपक अ. राठोड**
**रुम नं.जी.९, पारशीचाळ,**
**नरीमन रोड,**
**विलेपार्ले (पू), मुंबई ४०० ०५७.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पूर्व विभाग, आझाद रोड,**
**गुंदवली, अंधेरी (पू),**
**मुंबई ४०० ०६९.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.दिपक अ. राठोड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी तक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, ओम सिध्दीविनायक इमारतीमधील श्री.पुरुषोत्तम वाघेला, रुम नं.३०३ आणि त्यांना मिळालेले दुकान, श्री.ईश्वर भगवानदास चौहान, रुम क्र.१०१ आणि त्यांना मिळालेले दुकान, श्री.धीरज यशवंत मिस्त्री, रुम क्र.१०२ व त्यांना मिळालेले दुकान, श्री.अरविंद मोहनलाल मवानी यांना १०२ व २०३ रुम कोणत्या कारणास्तव मिळाले. श्री.दिनेश जीवराज सोलंकी, रुम क्र.१०३ व त्यांना मिळालेले दुकान, श्री.संजय शंकर मोडक यांना कोणत्या कारणास्तव रुम मिळाला इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती दिली नसल्याने आयोगाकडे क्र.१२२८/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. अपीलकारास सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२४.११.२००८ रोजी

आदेश पारित केले होते.  त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने आयोगाकडे क्र.४७४/०२ ही तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदाराने कबूल केले की, मागणीप्रमाणे गैरअर्जदाराने तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली आहे.  यावरून राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अमंलबजावणी झाली आहे.  सदर प्रकरणी तक्रारदाराची काही तक्रार नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७३३/०२**

**श्री.ॲड. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर**
**जिंतूर कॉलनी, सेलू, जि.परभणी. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ॲड श्रीकांत वाईकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१२.२००८ रोजी अर्ज करुन, जिल्हाधिकारी परभणी यांनी दि.३०.०९.२००८ रोजी पाठविलेल्या चौकशी अहवालातील मुध्दा क्र.२ ची चुकीची चौकशी करुन खोटा अहवाल पाठविल्याबाबत दि.१४.११.२००८ रोजी गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी ठाकूर यांनी कार्यालयातील पाठविलेल्या तक्रारीवर काय कारवाई केली याबाबतीची सविस्तर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास विहित कालावधीत माहिती मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, चौकशी अहवालातील मुध्दा क्र.२ ची चौकशी करुन खोटा अहवाल सादर केल्याबाबत तक्रार केली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रारीवर जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला. अहवालाची प्रत अपीलकारास पुरविण्यात आली आहे. यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे सदर प्रकरणी व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता प्रतिनिधी पाठविला. संचालक नगरपरिषद प्रशासन यांनी सदर चौकशी अहवाल पुढील चौकशीसाठी विभागीयस्तरावर पाठविला आहे. विभागीय स्तरावर अहवाल प्रलंबित आहे. सदर वस्तुस्थिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४८७/०२**

**श्री.भिमराव रोहिदास घाडगे**
**इमारत क्र.डी-२३/२४, राधानगर टॉवर,**
**खडकपाडा, बारावेगाव रोड,**
**कल्याण (प), जि.ठाणे ४२० ३०१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस आयुक्त**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,**
**बृहन्मुंबई विभाग, मधु इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**१ ला मजला, पांडूरंग बुधकर मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस उप आयुक्त**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,**
**बृहन्मुंबई विभाग, मधु इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**१ ला मजला, पांडूरंग बुधकर मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१३. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. भिमराज घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०५.२००९ रोजी अर्ज करुन, श्री.दया नायक, पोलीस उप निरीक्षक, मुंबई, श्री.जानराव गोविंदराव औगड, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, मुंबई यांच्या मालमत्तेची गुप्त चौकशी करुन उघड चौकशीत त्याची मालमत्ता त्याच्या उत्पन्नापेक्षा जास्त असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने अपीलकाराने स्वत: शासनाच्या वतीने तक्रार दाखल केली. त्याबाबत गुन्हे दाखल आहेत. सदर दोन्ही गुन्हयातील संपूर्ण नोटीस फाईलच्या छायाप्रती साक्षांकित करुन मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास उत्तर देण्यात आले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०८.०७.२००९ रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. श्री.दया नायक प्रकरणात अद्याप तपास चालू असून प्रकरण न्यानप्रविष्ठ झालेले नाही. त्यामुळे अशी माहिती पुरविल्यास गुन्हयाचे तपासात किंवा आरोपीच्या अटकेत अडथळा निर्माण होउ शकेल म्हणून उक्त अधिनियमातील ८(१) (एच)/ ८(१) (ज) येथील तरतुदीनुसार माहिती नाकारली. माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले.

यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.दया नायक व श्री.जानराव औगड यांच्या विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयातील संपूर्ण नोटीस फाईलच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जावक नोंदवहीतील नोंदीच्या प्रमाणित प्रती अपीलकार यांना ७ दिवसात द्याव्यात. अप्पर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग यांनी, महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिलेल्या साद्या पत्राची प्रतही अपीलकारास देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. सदर प्रकरणी फाईल नोंटींगमध्ये तपास अधिकारी, संबंधीत वाचक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी कायद्याच्या अमंलबजावणीसाठी स्पष्ट केलेली मते नोंदविण्यात आलेली असल्यामुळे अशी माहिती उक्त अधिनियमातील कलम ८(१) (जी) येथील तरतुदीनुसार देउ नये, श्री.दया नायक प्रकरणात अद्याप तपास चालू असून प्रकरण न्याय प्रविष्ठ झालेले नाही. सदर बाब लक्षात घेता सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उर्वरित सर्व माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६५६/०२**

**श्री.एल.एस.कोल्हे**
**मु.पो.ता.कोपरगांव,**
**इंदिरा पथ, जि.अहमदनगर ४२३ ६०१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**९ हजारीमल सोमानी मार्ग,**
**छत्रपती शिवाजी टर्मिनलच्या विरुध्द,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**९ हजारीमल सोमानी मार्ग,**
**छत्रपती शिवाजी टर्मिनलच्या विरुध्द,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. एल.एस.कोल्हे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०१.२००९ रोजी अर्ज करुन, राष्ट्रीय मानव अधिकार अंतर्गत कोणकोणत्या केसेस आयोगाकडे पाठविता येतात. त्यास वकील द्यावा लागतो का? केस केल्यापासून किती दिवसांत निकाल लागतो. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाकडे केस करण्याकरिता नियमावली पुस्तीकेची छायाप्रत द्यावी. नियमावली पुस्तीकेसाठी एकूण रु.४०/- आयोगाकडे पाठविले. परंतू पुस्तीका मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०४.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय कळविला नाही. माहिती मिळाली नाही. म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, राज्य मानवी हक्क आयोगाकडील नियमावली पुस्तीकेची मागणी केली होती. माहितीपोटी रु.४०/- इतके शुल्क भरले होते. अपीलकाराने रु.४०/- भरले असता त्यांना रु.३५/- ची पावती मिळाली. नियमावली पुस्तीकेची छायाप्रत मिळाली. अपीलकाराचे आयोगाकडे रु.५/- शिल्लक राहिले. सदर रक्कम परत मिळावी अशी अपीलकाराची मागणी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांच्या खर्चाने रु.५/- अपीलकारास Money order ने परत करावेत. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २५.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/३६४४/०२

श्री.दिपक रा.शेळके
फ्लॅट नं.७, श्रध्दा संकुल-०१,
जुना गगापुर नाका, गंगापुर रोड,
नाशिक ४२२ ०१३. .... अपीलकार

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (शिक्षण)
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी

विवेचन

अपीलकार श्री. दिपक शेळके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२००९ रोजी अर्ज करून, आरोग्य विद्यापीठाच्या कर्मचा-यांना सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्तीवेतन, वैद्यकीय प्रतिपूर्ती इत्यादी योजना लागू करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती देणे शक्य होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०९ एप्रिल, २००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.०५.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचा-यांना प्रमाणसंहिता लागू करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. उत्तरवादीने सदर प्रकरणी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी खालीलप्रमाणे लेखी अहवाल सादर केला.

"महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना १९९८ मध्ये झाली त्यावेळी विद्यापीठात शासकीय/निम-शासकीय/खाजगी आस्थापनावरील कर्मचा-यांना नियुक्त करण्यात आले. त्यानंतर वेळोवेळी शासन मान्यतेने विद्यापीठातील कर्मचा-यांच्या पदांमध्ये वाढ करण्यात आली. त्यावेळी इच्छूक कर्मचा-यांचे विद्यापीठात समोवेशन करून करण्यात आले तसेच सरळसेवेने कर्मचा-यांची भरती करण्यात आली.

विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवाशर्ती नियम निश्चित करण्याबाबत वेळोवेळी फूटकळ स्वरुपात कार्यवाही करण्यात आली. परंतु त्यामध्ये एकसुत्रता नव्हती. तसेच कर्मचा-यांना अन्य विद्यापीठातील अथवा शासकीय सेवेतील कर्मचा-याप्रमाणे सेवा-सुविधा मिळत नव्हत्या. म्हणून राज्यातील अन्य विद्यापीठांमधील कर्मचा-यांप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवाशर्तीबाबत प्रमाणसंहिता (Standered Code) तयार करण्यासाठी विद्यापीठाने समिती नेमली. समितीचा अहवाल गतवर्षी शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर तातडीने कार्यवाही करुन त्याबाबतचा प्रस्ताव, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्यावर या विभागांनी वेळोवेळी उपस्थित केलेल्या आक्षेपांबाबतची माहिती त्यांना पुरविण्यात आली. आता सुध्दा वित्त विभागाने उपस्थित केलेल्या आक्षेपांबाबत माहिती देवून/खुलासा करुन संबंधीत नस्ती वित्त विभागाला सादर करण्यात आली असून ती सध्या वित्त विभागात प्रलंबित आहे. सदर प्रमाणसंहितेमध्ये कर्मचा-यांना भविष्यनिर्वाह निधी, पेन्शन, गटविमा योजना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इ.बाबींचा समावेश आहे.

वरील प्रमाणे वित्त विभागाची मान्यता मिळाल्यानंतर शासनाची मान्यता घेवून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचा-यांना प्रमाणसंहिता लागू करण्यात येईल."

वर नमुद केलेली वस्तुस्थिती अपीलकारास अवगत करण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगास सांगीतले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७१४/०२**

**श्री.वसंत शा.उटीकर**
**तिरंगा को.ऑप.हौ.सो.लि.,**
**डी-२०/०.३, तळ मजला, सेक्टर-२५,**
**जुईनगर (प), नवी मुंबई ४०० ७०५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त**
**(व्हॅट प्रशासन), नांदेड विभाग,**
**नांदेड, जि.नांदेड.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.विक्रीकर आयुक्त,**
**नांदेड विभाग, नांदेड, जि.नांदेड.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. वसंत उटीकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, सहाव्या वेतन आयोगाचे आग्रीमाची दोन महिन्याचे वेतनाएवढी रक्कमेची उचल किती कर्मचा-यास मंजूर केलेली नाही. सदरील उचल का मंजूर केलेली नाही. सदरील अग्रीम संबंधीत कर्मचा-यास कधी वितरित करणार आहात. किती कर्मचा-यांचे माहे सप्टेंबर ते डिसेंबर, २००८ या ४ महिन्याचे वेतन वितरित केलेले नाही. वेतन का? काढले नाही. ४ महिन्याचे वेतन केव्ही वितरित करणार आहात, १) वेतन व भत्ते २) रजा वेतन ३) प्रवास भत्ता ४) मुळ व दुय्यम सेवा पुस्तके इत्यादी माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी मुध्देनिहाय माहिती अपीलकारास पुरविली. पुरविलेली माहिती समाधानकारक नाही म्हणून अपीलकाराने दि.०५.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास ७ मुद्याबाबतची माहिती विहित वेळेत पुरवावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. मुध्देनिहाय्य परिपूर्ण

माहिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुन्हा पुरविली.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वेतन, वेतन आग्रीमाची रक्कम इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती.  वेतन, वेतन अग्रीमाची रक्कम मिळाली नसल्याची अपीलकाराची तक्रार आहे.  सदर कालावधीत अपीलकार रजेवर होते.  त्यामुळे वेतन अग्रीमाची रक्कम काढली नाही असा जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी युक्तीवाद केला.  अपीलकार दि.१७.०७.२००८ पासून कार्यालयात अनुपस्थित होते.  रजा मंजूर नसल्यामुळे अनुपस्थित कालावधीचे वेतन काढण्यात आलेले नव्हते असेही जन माहिती अधिका-यांनी दि.३१.०१.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले आहे.  माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिका-यांनी दक्षता घ्यावी.  सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयातील उपलब्ध माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७३२/०२**

**श्री.ॲड. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर**
**जिंतूर कॉलनी, सेलू, जि.परभणी. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ॲड श्रीकांत वाईकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१२.२००८ रोजी अर्ज करुन, जिल्हाधिकारी परभणी यांनी दि.३०.०९.२००८ रोजी पाठविलेल्या चौकशी अहवालातील मुध्दा क्र.२ ची चुकीची चौकशी करुन खोटा अहवाल पाठविल्याबाबत दि.१४.११.२००८ रोजी गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी ठाकूर यांनी कार्यालयातील पाठविलेल्या तक्रारीवर काय कारवाई केली याबाबतीची सविस्तर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास विहित कालावधीत माहिती मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, चौकशी अहवालातील मुध्दा क्र.२ ची चौकशी करुन खोटा अहवाल सादर केल्याबाबत तक्रार केली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रारीवर जिल्हाधिकारी यांनी चौकशी करून अहवाल सादर केला. अहवालाची प्रत अपीलकारास पुरविण्यात आली आहे. यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे सदर प्रकरणी व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता प्रतिनिधी पाठविला. संचालक नगरपरिषद प्रशासन यांनी सदर चौकशी अहवाल पुढील चौकशीसाठी विभागीयस्तरावर पाठविला आहे. विभागीय स्तरावर अहवाल प्रलंबित आहे. सदर वस्तुस्थिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२१३/०२**

**श्री. मोहम्मद युसुफ फारुख्र खान**
**ब/सी, मुस्ताफा चाळ,**
**अचानक नगर, मुंब्रा, ठाणे ४०० ६१२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ**
**ख्रोली क्र.७४, तळमजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.मोहम्मद युसुफ फारुख्र खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१२.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार हजर होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, अपंग वित्त विकास महामंडळ चालू झाल्यापासून ते आजतागायत मुंबई शहर, मुंबई उपनगर तसेच ठाणे जिल्हातून किती अपंगानी महामंडळाकडे कर्जासाठी अर्ज केले आहेत याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहितीपोटी रु.३६, ६००/- इतकी रक्कम भरण्याबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनीही गैरतक्रारदाराने दिलेल्या उत्तराचे समर्थन केले होते. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.१३५५/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. गैरतक्रारदारांनी तक्रारदारास प्रथम संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर निवडक कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास पुरवाव्यात असे आयोगाने दि.२३.१२.२००८ रोजी आदेश पारित केले होते. गैरतक्रारदारांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२१३/०२ ही तक्रार केली.

गैरतक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार निरीक्षणाकरिता संबंधीत कागदपत्र तक्रारदारास उपलब्ध करुन दिली असल्याचा लेखी अहवाल दि.०९.०६.२००९ रोजी आयोगास सादर केला.  परंतू तक्रारदाराने फाईल न पहाता सर्व फाईलच्या छायाप्रतीची मागणी केली.  सर्व फाईलच्या छायाप्रती काढणे आवाक्याबाहेरचे काम आहे असे तक्रारदारास सांगीतले. तक्रारदाराने लाभार्थ्यांची यादी मागीतली.  तेव्हा गैरतक्रारदारांनी लाभार्थ्यांची यादी तक्रारदारास पुरविली.  राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी पालन केले आहे. तक्रारदाराने सर्व फाईल्स पहाण्याचे नाकारले आहे.  सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाच्या दि.२३.१२.२००८ च्या आदेशानुसार आवश्यकती कार्यवाही केली आहे.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**                  **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १२.११.२००९**          **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१६२/०२**

**श्री.गांधी आयकन्नू कोंडर**
**अन्नानगर, न्यू लिंक रोड,**
**शिवशक्ति, एस.आर.ए.सह.गृ.संस्था,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण**
**(अभियांत्रिकी विभाग) यांचे कार्यालय,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण**
**(अभियांत्रिकी विभाग) यांचे कार्यालय,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गांधी आयकन्नू कोंडर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०२.२००९ रोजी अर्ज करुन, अन्नानगर, न्यु लिंक रोड, अंधेरी (प) येथील एस.आर.ए. योजणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०३.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. शासनाव्दारे देण्यात आलेले पत्र शासनाच्या संबंधीत विभागाकडून प्राप्त करुन घ्यावे. आर.टी.ओ. व विकासकामध्ये कोणत्याही प्रकारच्या एम.ओ.यु.संबंधीचे कागदपत्र विभागाकडील संबंधीत फाईलमध्ये आढळून येत नाहीत. एम.ओ.यु.संबंधीची कागदपत्र आर.टी.ओ.विभागाकडून प्राप्त करुन घ्यावीत. संबंधीत फाईलचे निरीक्षण करावे. जेणेकरुन हवी असलेली माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देता येईल असेही जन माहिती

अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१४.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली.  आदेश पारित केले नाहीत.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.   सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आर.टी.ओ. व विकासकामध्ये झालेल्या एम.ओ.यु. ची छायाप्रत मागीतली होती.  एम.ओर.यु. झोपडपट्टी  पुनर्वसन प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे.  या प्रकरणी मी असे आदेश देतो की, एम.ओ.यु.ची प्रत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १०.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५४५/०२**

**श्री.ए.एम.सावंत**
**केसर इंटरप्रासेस लि.,**
**चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००५.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता**
**ए वार्ड, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ए.एम.सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०७.२००९ रोजी अर्ज करुन, विद्युत मीटर क्र.०२७८६५ बसविण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. सदर विद्युत मीटर फार पूर्वी बसविलेले आहे. मीटर मंजूरीकरिता सादर केलेली कागदपत्र फार जूनी असल्याने ती उपलब्ध नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२३.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली कागदपत्र फार जूनी असल्याने ती उपलब्ध नाहीत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.०९.२००९ रोजी अपीलकारास कळवून प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विद्युत मीटर क्र.०२७८६५ बसविण्याकरिता सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. सदर कागदपत्र फार जूनी असल्याने ती उपलब्ध नाहीत. त्यामुळे ती अपीलकारास पुरविता येत नाहीत असे जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास कळविले आहे. विद्युत मीटर फार वर्षापूर्वी बसविलेला आहे. त्यामुळे जूनी कागदपत्र उपलब्ध होत नाहीत असा उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी युक्तीवाद केला. जन माहिती अधिका-याकडे माहिती उपलब्ध नाही. यामुळे ते अपीलकारास पुरवू शकत नाहीत. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७५३/०२**

**श्री. सिमप्रित सिंग**
**२९-३०, पहिला मजला,**
**ए विंग, हाजी हबीब इमारत,**
**नायगाव, क्रॉस रोड, दादर (पू),**
**मुंबई ४०० ०१४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**टी विभाग, नाना देविदयाल मार्ग,**
**मुलुंड (पू), मुंबई ४०० ०८०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**टी विभाग, नाना देविदयाल मार्ग,**
**मुलुंड (पू), मुंबई ४०० ०८०.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सिमप्रित सिंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०२.२००९ रोजी अर्ज करुन, म्हात्रे नगर झोपडपट्टी निष्काशीत करण्यासंबंधी रहिवाशांना दिलेल्या नोटीसच प्रत, दि.०१.०१.१९९५ पूर्वीच्या सर्व्हे रिपोर्टची प्रत, झोपडपट्टी तोडण्याकरिता दिलेल्या कारणाच्या दिशा निर्देशकाची प्रत इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२०.०३.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण, चुकीची माहिती पुरविली असल्याच्या करणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपीलावरील सुनावणी दरम्यान अपीलकाराने प्रतिपादन केले की, डिसेंबर, २००८ च्या नोटीसच्या प्रतीची मागणी केली होती. त्याऐवजी सन २००६ च्या प्रती देण्यात आल्या. त्यावर जन माहिती अधिका-यांनी

प्रतिपादन केले की, सन २००८ सालात नोटीस बजावल्या नव्हत्या. त्यामुळे कार्यालयातील उपलब्ध नोटीसेसच्या प्रती अपीलकारास पुरविल्या. सन १९९५ ची पात्र/अपात्रची यादी पडताळणीसाठी उपजिल्हाधिकारी यांना सादर केली आहे. ती मागवून घेउन अपीलकारास देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी नमुद केले होते. अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.२ बाबत कार्यालयात माहिती उपलब्ध नव्हती ती उपलब्ध करून अपीलकारास पुरवावी असे दि.०३.०६.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, मुलुंड (पू) येथील मिठानगर रोडवरील म्हात्रे नगर झोपडपट्टीच्या निष्कासनाबाबतच्या नोटीसेस व यादी इत्यादी माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी ३० दिवसाचा कालावधी उलटून गेल्यानंतर माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निशुल्क माहिती पुरवावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १३.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५७५/०२**

**श्री. चंद्रभान सुखदेव सांगळे**
**२०४, दुसरा माळा, गंगागिरी सोसा.,**
**प्रसाद हॉटेलसमोर, पुना लिंक रोड,**
**तिसगाव नाका, कल्याण (पु),**
**ता.कल्याण, जि.ठाणे.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चंद्रभान सांगळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. कोर्ट निर्णयाप्रमाणे ५० टक्के प्रतिक्षा यादी व ५० टक्के मा.मुख्यमंत्री यांनी नवीन मंजूरी या पैकी प्रतिक्षा यादी नुसार किती सदनिका वितरीत झाल्या त्या त्या लाभधारकांचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक.
२. जानेवारी २००६ साली, २००७ साली व ऑक्टोंबर २००८ साली अर्जदाराचा प्रतिक्षा नंबर कळवावा.
३. २००६, २००७, २००८ साली किती सदनिका मा.मुख्यमंत्री महोदयांनी वितरीत केल्या.

४. अर्जदार यांचा कोर्टाच्या निर्णयानुसार प्रतिक्षा यादीतील क्रमांक डावलून किती सदनिका वितरीत करण्यात आल्या याची यादी व लाभधारकांची नावे व पत्ता.

५. मा.हायकोर्ट महोदयांनी सदनिका वितरणा बद्दल दिलेले आदेश व त्या नुसार शासनाने निश्चित केलेले शासकीय निर्णय या दोन्हींच्या प्रती.

६. मा.अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई यांना गृहनिर्माण विभागाने दि.३१.०१.१९९० रोजी अर्जदार यांना प्राधान्याने सदनिका वाटपाचे आदेश दिलेले आहेत असे असतांना त्यांना प्रत्यक्ष सदनिका वाटप का करण्यात आले नाही. यासंबंधीची माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी दि.१२.०५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती अपूरी व वस्तूनिष्ठ नाही. या कारणावरुन अपीलकाराने दि.२५.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, मुंबई नागरी समुह यांनी अपीलकारास माहिती द्यावी असे दि.२९.०७.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०८.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सन १९८९ साली १०% आरक्षणात मंजूर झालेल्या सदनिकाबाबत अनुषंगीक एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन

प्रतिपादन केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १३.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/३६७१/०२

**श्री. पांडूरंग विश्वानाथ देवकाते**
**प्लॉट नं.१७४, प्राईम रेसिडन्सी, समर्थनगर,**
**पो.ऑ.जवळ, सुपरव्हिजन संगणक प्र.केंद्र**
**समर्थनगर, औरंगाबाद ४३१ ००१.** .... अपीलकार

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन)**
**राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने विधान भवन, २ रा मजला, शहिद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (सा.शा)**
**राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने विधान भवन, २ रा मजला, शहिद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अपीलकार श्री.पांडूरंग देवकाते यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.१२.२००८ रोजी अर्ज करुन, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबईसाठी सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी भरती-२००८, दि.१७.११.२००८ रोजी झालेल्या मुलाखत चाचणी घेणा-या सर्व अधिका-यांचे नावे व पदे याची यादी, यादी संबंधीत अधिका-याकडून प्रमाणित केलेली प्रत इत्यादी अ, ब, क, ड मुद्यावर अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ८(१) 'ई' आणि 'जे' अन्वये माहिती नाकारली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.१७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. दि.१७.११.२००८ रोजी झालेल्या मुलाखत चाचणी घेणा-या अधिका-यांची नावे पदे याबाबतची माहिती अपीलकारास द्यावी असे आदेश

पारित केले.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.  अपिलकार उपस्थित नव्हते.  सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी-२००८, दि.१७.११.२००८ रोजी झालेल्या मुलाखतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी उचित आदेश पारित केले आहेत.  त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७१५/०२**

**श्री.हिरासिंह गु.चंदेल**
**निशांत वैभव नगर, जिंतूर रोड,**
**परभणी ४३१ ४०१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव**
**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य**
**१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (२)**
**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य**
**१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,**
**मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हिरासिंह चंदेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०३.२००७ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कार्यालयात उक्त अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या व्दितीय अपीलाच्या सद्यस्थितीबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०४.०४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.०२.०६.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित

होते.   सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलाची सद्यस्थिती बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी दि.२८.०३.२००७ रोजी उत्तर दिले.  अपीलकाराच्या एकूण २० अपील / तक्रारीपैकी १६ व्दितीय अपीलाची माहिती देण्यात आली.  उर्वरित ४ व्दितीय अपीलाची माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी सांगीतले होते.  त्यानंतर अपीलकारास माहिती मिळाली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी Missing प्रकरणांचा जाणीवपूर्णक कसून शोध घ्यावा.  त्यानंतर अपीलकारास सविस्तर माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.११.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२८/०२**

**श्री.विलास गणपत डांगे**
**१/५१ माताजी रानुजी इमारत,**
**सनमिल लेन, बी.जे.मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई ४०० ०१३. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**प.वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**इस्टर्न एक्सप्रेस हायवे, सायन, चुनाभट्टी,**
**मुंबई ४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी,**
**प.वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**इस्टर्न एक्सप्रेस हायवे, सायन, चुनाभट्टी,**
**मुंबई ४०० ०२२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विलास डांगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०१.२००८ रोजी अर्ज करून, सायन मुंबई येथील वसंतदादा पाटील प्रतिष्ठान पी.व्ही.पी.पी. अभियंता महाविद्याल्यासंबंधीचा लेखी अहवाल, बॅलन्स शीट, कार्यकारी समितीच्या इतिवृताच्या प्रतीची मागणी केली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.२७.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते जन माहिती अधिकारी उपस्थिती नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सायन, मुंबई येथील पी.व्ही.पी.पी.अभियंता महाविद्याल्याबाबत एकूण १३ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेली महाविद्यालयाबाबतची माहिती, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०३२/०२**

**श्री. संजय आत्माराम बाईंग**
**३०२, गौरव विहार, गौरव बहार**
**विहार स.गृ.संस्था, गौरव गार्डन कॉम्प्लेक्स,**
**बंदर पाखाडी रोड, कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक**
**सहकारी संस्था आर वॉर्ड,**
**एम.एम.आर.डी.ए. इमारत,**
**अे-१, ३१५, ३१६, वडाळा ट्रक टर्मिनर्स जवळ,**
**वडाळा (पू), मुंबई ४०० ०३७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. निबंधक**
**सहकारी संस्था आर वॉर्ड,**
**एम.एम.आर.डी.ए. इमारत,**
**अे-१, ३१५, ३१६, वडाळा ट्रक टर्मिनर्स जवळ,**
**वडाळा (पू), मुंबई ४०० ०३७.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. संजय बाईंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०९.२००८ रोजी अर्ज करुन, गौरव गार्डन कॉम्प्लेक्स, बंदर पाखाडी रोड, कांदिवली (प) मुंबई ६७ येथील गौरव बहार विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. संबंधी संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, व्यवस्थापक समितीच्या सदस्यांची नावे, बंधपत्राच्या प्रती, बैठकीच्या इतिवृत्ताची प्रती इत्यादी एकूण १२ मुद्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.१०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, गौरव बहार विहार सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादी हजर होते. मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविली असल्याची पोच पावती जन माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. यावरुन उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६१८/०२**

**श्री. राजेश श्री.परुळेकर**
**क्वीन्स पार्क, बिल्डींग नं.३,**
**बी/३०७, पाटनाका पोस्ट ऑफीस पुढे,**
**वसईगांव (प), जि.ठाणे ४०१ २०१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा रजिस्ट्रार जनरल**
**मुंबई उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा मास्टर/असिं. प्रोथोनोटरी**
**मुंबई उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. राजेश परुळेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, भाग धारकांना रक्कम आदा करण्याबाबत प्रशासकाने घेतलेल्या निर्णयासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मागीतलेल्या माहिती संबंधी प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. जन माहिती अधिका-यांने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकाराचे प्रथम अपील निकालात काढले. सदर

प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०९.०२.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०७.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५७४/०२**

**श्री. सलमान फारसी अे लतिफ आयमी**
**आर एम पी, रत्नागिरी ४१५ ६१२.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी ,**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**सर ज.जी. समूह रुग्णालये भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी,**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**सर ज.जी. समूह रुग्णालये भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सलमान फारसी अे लतिफ आयमी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०४.२००९ रोजी अर्ज करुन, रूग्णालयाचे रूग्ण कागदपत्राची मागणी केली होती. अपीलकार हे न्यायालयीन बंदी रूग्ण कागदपत्राची मागणी केली होती. अपीलकार हहे न्यायालयीन बंदी रूग्ण आहेत. यामुळे रूग्णालयाचे रूग्ण कागदपत्रेही बंदी रूग्णाकडे देणे शक्य नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, रुग्णालयाचे रुग्ण कागदपत्राची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकार न्यायालयीन बंदी रुग्ण असल्याच्या कारणावरुन माहिती नाकारली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ (१) (ख) अनुसार कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली असल्यास अशी माहिती पुरविता येत नाही. सदर प्रकरणी तसे न्यायालयाचे आदेश दिसून येत नाहीत. अपीलकाराने स्वत:च्या Case paper ची माहिती मागीतली आहे. त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपीलकारास १५ दिवसांचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०३.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५६१/०२**

**श्री. जगदीश हिंमतराव बोरसे**
**रुम नं.१८, नंदादीप सह.गृ.नि.सं.,**
**प्लॉट नं. सी-३३, सेक्टर-१२, खारघर,**
**नवी मुंबई ४१० २१०. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. जगदीश बोरसे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१०.२००८ रोजी अर्ज करुन, संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय या कार्यालयाने क्र.१९५६०, दि.१९.०४.२००५ रोजी गट निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था या पदावर अपीलकारास सामावून घेणेसंबंधी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविलेल्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती ही सन २००३-२००५ या कालावधीतील आहे. अपीलकाराने अर्जात नमुद केलेले संदर्भ कार्यासनात शोध घेउनही आढळून आले नाहीत. त्यामुळे अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे दि.१५.११.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप आत्यंत साधे आहे. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात आढळून येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेले उत्तर योग्य वाटत नाही. शासकीय कार्यालयातील कागदपत्र जतन करून ठेवणेबाबत शासनाचे विशिष्ट असे (अ, ब, क, ड वर्गवारी) आदेश आहेत. तेव्हा अपीलकाराने मागणी केलेल्या कागदपत्राची वर्गवारी काय केली होती. त्यानुसार सर्व संबंधीत कागदपत्राचा कसून शोध घेउन अपीलकारास याबाबत सविस्तर माहिती पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधी जन माहिती अधिका-यांनी कसून शोध घेउन त्यानुसार तसे अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १३.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५९०/०२**

**श्री. नारायण म.रावळ**
**६९, ओमकार इमारत,**
**आनंद नगर, सांताक्रुझ (पू),**
**मुंबई ४०० ०३३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**(मिळकत व्यवस्थापक-२),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई यांचे कार्यालय,**
**म्हाडा इमारत, मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई यांचे कार्यालय,**
**म्हाडा इमारत, मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. नारायण रावळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

सदनिका नं.६९, ओमकार बिल्डींग, आनंदनगर, सांताक्रुझ (पू) मुंबई ५५ या सदनिकेच्या हस्तांतर करणेसाठी सर्व आवश्यक कागदपत्राबरोबर कुंटुंबातील सर्व सदस्यांचे स्वाक्षरी केलेले ॲफीडेव्हीट (प्रतिज्ञापत्र) सादर केले आहे. या पैकी कोणाचीही हस्तांतरण करण्याविषयी लेखी तक्रार आपल्याकडे असल्यास त्याची सविस्तर माहिती हवी आहे. तसेच तक्रार केली असल्यास तक्रारपत्राची प्रत हवी आहे. माहितीचे व टपालाचे शुल्क कळवावे म्हणजे रक्कम m/o ने पाठविता येईल.

मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याच्या करणावरुन अपीलकाराने दि.२५.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास सदर प्रकरणी ८ दिवसात

माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२३.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सदनिका हस्तांतरणाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवासाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.११.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७५२/०२**

**श्री. अंन्सारी मो.परवेझ**
**बर्ग-इ-अन्सार,**
**१९/२३, तिसरा मजला, घेलाबाई स्ट्रीट,**
**मदनपुरा, मुंबई ४०० ००८. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एम/पूर्व विभाग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण अधिकारी**
**हिंदू कॉलनी, शिक्षण कार्यालय, दादर, मुंबई ४०० ०१४. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अन्सारी परवेझ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०३.२००९ रोजी अर्ज करुन, गौत्तमनगर गोवंडी, मुंबई ४३ येथे रीयाझूल इस्लाम हायस्कूलच्या इमारतीत इक्बाल मेमोरियल प्राथमिक शाळा कार्यरत आहे. सदर प्राथमिकशाळा मान्यताप्राप्त आहे किंवा मान्यताप्राप्त नाही. सदर प्राथमिक शाळा मान्यता प्राप्त नसल्यास सदर शाळेत विद्यार्थ्यांना कसा प्रवेश देण्यात येतो याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराचा दि.२३.०३.२००९ चा अर्ज एम/पू या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता वर्ग करण्यात आल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.०२.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०७.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपील अर्ज अपिलीय प्राधिकारी, सहाय्यक आयुक्त, एम/पूर्व विभाग यांना अग्रेषित करण्यात आलेला आहे. तरी अपीलकाराने संबंधीत विभागाकडे संपर्क साधावा असे उपशिक्षणाधिकारी, परिमंडळ क्र.५ यांनी अपीलकारास दि.२५.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, इक्बाल मेमोरिय प्राथमिक शाळा मान्यताप्राप्त आहे किंवा कसे याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिका-यांची तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १३.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७६२/०२**

**श्री. प्रा.सुभाष दोधूनाथ खरे**
**उष:काल, जय बजरंग कॉलनी,**
**मालेगांवकॅम्प, ता.मालेगांव, जि.नाशिक. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त प्रबंधक**
**लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रबंधक**
**लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (माध्यमिक)**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. प्रा.सुभाष खरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०५.२००६ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त अनुदानीत संस्थेतील कनिष्ठ महाविद्यालयामधून शिक्षक म्हणून निवृत्त झाल्यावर, त्या आगोदर केंद्र शासनाच्या डिफेन्स खात्यातील १० वर्षाची सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राहय धरली जावी. यासाठी शासन आदेश, वित्त विभाग क्र.पीईएन १०९२/२७, सेवा-४ दि.१९.०७.१९९३ नुसार कार्यवाही व्हावी म्हणून केलेली विनंती शिक्षण खात्याकडून अद्याप विचारात घेतली गेली नाही. याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम २ (च) दिलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार माहिती या सदरात मोडत नाही. त्यामुळे अपीलकाराने

विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०६.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०७.२००६ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, निवृत्तीवेतनासाठी केंद्र शासनाच्या डीफेन्स खात्यातील १० वर्षाची सेवा राज्य सेवेस जोडून देणेबाबत मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, माहितीच्या व्याख्येनुसार "माहिती" या सदरात मोडत नसल्याचे अपीलकारास दि.०२.०६.२००६ च्या पत्रानुसार कळविलेले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक कार्यवाही केली आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६१६/०२**

**श्री. दिलीप रा.कदम**
**मु.पो.कोयनावेळे (घोटकॅम्प)**
**ता.पनवेल, जि.रायगड. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दिलीप कदम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. "घेतलेला निर्णय हा कोणत्या स्तरावर घेण्यात आला याबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच सदरचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी त्यांनी कोणत्या कागद पत्रांची अथवा आम्ही पाठविलेल्या विनंती अर्जाची वस्तुस्थिती प्रमाणे पाहणी करुन घेण्यात आला आहे का? याची माहिती देण्यात यावी? किंवा सदरचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी संबंधित महसुल खात्यातील मंत्री महोदय यांचे संमतीने अथवा संबंधित विषयात अनुसरुन घेण्यात आले आहे का? याची माहिती देण्यात यावी. तसेच संबधित निर्णय घेण्या अगोदर मा.कक्ष अधिकारी श्री.समिर सावंत यांनी मा.जिल्हाधिकारी सो.रायगड अलिबाग यांचेकडून योग्य माहिती प्राप्त करुन घेतली आहे का? किंवा त्यांनी याबाबत

योग्य सुचना संबंधित कक्ष अधिकारी यांना दिल्या होत्या का? यांची माहिती देण्यात यावी.

२. संबंधित निर्णय घेण्याच्या अगोदर आम्ही मा.कक्ष अधिकारी महसुल व वन विभाग यांनी दि.०७.०१.२००९ रोजी आमच्या दोन्ही विषयाबाबत सविस्तर निवेदन तसेच योग्य ती कागदपत्रे सादर करण्यात आली होती याची पाहणी संबंधित कक्ष अधिकारी यांनी करण्यात आली होता का याची माहिती देण्यात यावी. तसेच संबंधित निवेदनामध्ये सविस्तर भूमिका स्पष्ट केली होती तरी मा.समीर सांवत यांनी घेतलेल्या निर्णयाची भूमिका स्पष्ट करण्यात यावी. याची माहिती देण्यात यावी."

अपीलकार श्री.दिलीप कदम यांना कोयना प्रकल्पग्रस्त म्हणून देय जमीन देण्यात आली असल्याने त्यांना पुन्हा जमीन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसचे तळोजा औद्योगिक क्षेत्रासाठी झालेल्या भुसंपादनामुळे देय ठरणा-या पर्यायी जमिनीसाठी आवश्यक निधी अपीलकार श्री.कदम यांनी विहित मुदतीत शासन जमा न केल्यामुळे त्यांना पर्यायी जमीन देय होत नाही असे जन माहिती अधिकारी यांना अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दाखल करण्याऐवजी राज्य माहिती आयोगाकडे थेट व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तळोजा औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित झालेल्या जमिनीच्या मोबदल्यात शासनाच्या नियमाप्रमाणे २: १ प्रमाणात पर्यायी जमिन मिळाणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती मागीतली असल्याचे जन

माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकाराने प्रश्नोत्तर स्वरूपाची मागीतली असली तरी त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकारास कळविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीनुसार सदर प्रकरणाची सविस्तर वस्तुस्थितीदर्शक माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५९३/०२**

**श्री. सेवालाल हिरालाल शाह**
**गणनाकृत झोपडे क्र.५५ १/१ सी,**
**अंतिम भुखंड क्र.२७३/२७४,**
**जवाहर पथ, घाटकोपर (पू), मुंबई ४०० ०७७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ,**
**म्हाडा भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (१)**
**मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ,**
**म्हाडा भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सेवालाल शाह यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

आर.एम.डी. फाईल निरीक्षण करणे व आवश्यक कागद पत्रांची सत्य प्रती व खालील मुद्दे

१. कोणत्या आदेश, सर्कुलर, नियमा प्रमाणे MHB सध्याच्या मुंबई मंडळाने आर.एम.डी. इस्टेट च्या भाडेकरुनी स्वतःच्या भाडेकरु सन १९६२ एप्रिल महिन्यात करुन घेतला आहे.

२. कोणत्या लेखी आदेश अथवा सर्कुलर सुधारणा पत्राव्दारे EM १ च्या पंतनगर चे भाडे वसुलकाराने नियमित आर.एम.डी.च्या भाडेकरु भाडे पावती वर भाडे Rent शब्दा च्या ऐवजी नुकसान भरपाई Compensetion वापरला आहे. त्या संबंधित आदेशपत्र व इतर पत्रके द्यावेत.

३. भाडेपावतीत फेर बदल करणे अथवा त्याचा दर्जा बदलणे भाडेवसुलकाराच्या कक्षेत आहे का? कोणत्या नियमाप्रमाणे, कुणाच्या आदेशाने संबंधित कागद पत्रांची साक्षांकित छायांकित माहिती पोष्टा व्दारे की व्यक्तिगत?

जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-१ यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

संदर्भाधिन माहिती अधिकारा अंतर्गत आपण केलेल्या अर्जाअनुषंगाने कळविण्यात येते की, आर.एम.डी.इस्टेट येथील दुकान क्र.२४१/०५ या दुकानाच्या भाडेपावतीवर भाडेऐवजी नुकसान भरपी याचा उल्लेख केलेला आहे. याबाबतची माहिती या कार्यालयाचे पत्र क्र.९२२ दि.२२.०५.२००९ अन्वये भाडेवसुलीकार यांचेकडून मागितला असता भाडेवसुलीकार यांनी दि.२७.०५.२००९ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालात आर.एम.डी.इस्टेट पंतनगर, घाटकोपर या जागेचे देयक क्षेत्रनोंदवहीनुसार नुकसान भारपाई असे नोंद क्षेत्रवहीत उल्लेख केलेला आहे. त्याप्रमाणे आर.एम.डी. इस्टेट येथे जे रहिवासी राहत आहेत त्यांचेकडून नुकसान भरपाई म्हणूनच रक्कम स्विकारली जात आहे. त्यांना भाडे सेवाशुल्क नाही. म्हणून भाडेशुल्क नावाने पावती देण्यात येत नाही.

जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२२.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२३.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. अपीलकारास मागणीप्रमाणे १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०८.२००९ रोजी माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आर.एम.डी भाडेकरुच्या गाळे भाडे पावती विषयी, खोली क्र.५१८७, वि.क्र.१८५ बी विंग पंतनगरचे गाळे नामांतरण विषयी, एस.आर.ए.अंतर्गत आर.एम.डी.गाळे धारकांना प्रमाणित केले नाही याविषयी अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी अपीलकारास दि.२८.०८.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे अपीलावरील कागदपत्रावरुन दिसते. व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकाराने आयोगास सांगीतले की ते मासीक भाडे भरत असून भुर्दंड भरत नाहीत. म्हाडाच्या जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले की भाडे वसुलकार यांना गाळेधारकाकडून बाकी राहिलेली थकबाकी स्विकारुन पावती भुर्दंड म्हणून पास करावी असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पावती देण्यात येते. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली आहे. पुरविलेल्या माहितीचे विशलेषण करण्याचे काम आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.११.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**